
• पंढरपूर • मंगळवार, ५ नोव्हेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
• वर्ष २९ • अंक - १६४


उध्दव -राज एकाच दिवशी सोलापुरात
PII


देवभूमी उत्तराखंडच्या स्वर्गारोहण मार्गावर पाच पांडव आणि द्रौपदीच्या भव्य....
PIII

## At a Glance

### विवाहितेचा छळ; तिघांवर गुन्हा दाखल



**सोलापूर :** हुंड्यासाठी विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विवाहिता श्रुती निखिल पाटील( वय 30 राहणार यश नगर, भाग 2 मुरारजी पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पती निखिल नंदकिशोर पाटील, सासू नंदा नंदकिशोर पाटील, सासरे नंदकिशोर अनंतराव पाटील (सर्व राहणार यश नगर, भाग 2, मुरारजी पेठ, सोलापूर ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. हुंड्यासाठी मानसिक व शारीरिक छळ करून जाचहाट केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### लाडक्या बहिणींनी मुख्य-मंत्र्यांच्या पाठीशी रहावे



**सांगोला :** भाऊ बीज निमित्ताने लाडक्या बहिणींनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर खंबीर पने उभे राहावे अशी अपेक्षा सांगोल्याचे आमदार शहाजी बापू पाटील यांनी व्यक्त केली. आज जीवनात यशस्वी झाल्याची कृतज्ञता बहिणी बद्दल व्यक्त केली. संजय राऊत महा विकास आघाडीच्या सर्व हालचाली दिल्ली मधून चालतात असे म्हटले तर वाईट वाटून घेऊ नका. ठाकरे गट हा पक्षच महिला विषयी आदर असणारा नाही. अरविंद सावंत यांनी हात जोडून महिलांची माफी मागितली पाहिजे अशी मागणी आमदार शहाजी बापू पाटील यांनी व्यक्त केली.

### झोपेतच एकाचा मृत्यू

**सांगोला :** न्यू बुधवार पेठ येथील शशिकांत धूळपा शेरखाने (वय 46) यांचा झोपेतच अचानक मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी पहाटे तीन वाजून दहा मिनिटांच्या सुमारास घडली. शशिकांत हे राहत्या घरी असताना पत्नीने त्यांना झोपेतून उठवण्याचा प्रयत्न केला असता ते उठले नाहीत. त्यांना बेशुद्ध अवस्थेत त्यांचा भाच्चा भगवान शिंदे यांनी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

# तीन पर्यंतची प्रतीक्षा : पवारांचा फोन आलाच नाही

# दिग्गजांचा प्रचार शुभारंभ!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** अनपेक्षितरित्या पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाली आहे. आज अर्ज माघारी घेण्याच्या अखेरच्या दिवशी तीन वाजेपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा निरोप न आल्यामुळे उमेदवार अनिल सावंत यांची उमेदवारी कायम राहिली. तर काँग्रेस कडून भगीरथ भालके यांची उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे या मतदारसंघात महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाली. अनिल सावंत यांची उमेदवारी कायम राहत भगीरथ भालके त्यांना समर्थन देतील आणि अर्ज काढून घेतील अशी आशा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या कार्यकर्त्यांना होती. तथापि भगीरथ भालके यांनी आपली उमेदवारी निश्चित असून काँग्रेस ही जागा सोडणार नाही असे सांगितले होते. आणि प्रचार शुभारंभ केला होता. त्यामुळे कदाचित सावंत यांना उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा निरोप येईल असे वाटत होते. जवळपास पावणेतीन वाजेपर्यंत सर्व कार्यकर्ते प्रतीक्षेत होते.

मागील आठवड्यात शरद पवार यांना भेटल्यानंतर त्यांनी , त्यांच्या कार्यकर्त्यांना सांगितले होते की, जोपर्यंत माझा किंवा जिल्हाध्यक्ष बळीराम काका साठे यांचा फोन येत नाही तोपर्यंत तुम्ही अर्ज माघारी घेऊ नका.

आज अखेरच्या दिवसापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस कडून कुठलाही निरोप न आल्यामुळे अनिल सावंत यांना पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातून लढवायचे आहे याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस ठाम असल्याचे दिसले. सावंत यांनी महिनाभरापूर्वीपासूनच प्रचाराला सुरुवात केली आहे. परंतु अर्ज राहिल्यानंतर मात्र आज त्यांचे सर्व नातेवाईक पंढरपूर मध्ये आले आणि वैयक्तिक गाठी भेटीतून त्यांनी मोठ्या धमाक्यात प्रचार यंत्रणा सुरू केली.


समाधान आवताडे | भगीरथ भालके | अनिल सावंत | दिलीप धोत्रे

दरम्यान भाजपाचे उमेदवार समाधान आवताडे यांनी आज मोठ्या उत्साहात आणि प्रचंड शक्ती प्रदर्शनात प्रशांत परिचारक यांच्या समवेत प्रचाराला प्रारंभ केला.

प्रशांत परिचारक आणि समाधान आवताडे यांच्यावर डझनभर जेसीबीने पुष्पगुष्टी करत त्यांचे प्रचंड स्वागत करण्यात आले. मोठ्या शक्ती प्रदर्शनात आज ग्रामीण भागातून हा प्रचाराचा शुभारंभ झाला.

भगीरथ भालके यांनी यापूर्वीच प्रचाराचा शुभारंभ केला आहे तथापि उद्यापासून संपूर्ण ग्रामीण भागाचा दौरा आणि प्रत्येक गटनिहाय गाठीभेटीचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. त्यांची उमेदवारी पूर्वीच झाल्यामुळे त्यांना प्रचाराला बराच अवधी मिळाला तथापि राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारी माघारी घेईल अशी असलेली आशा मात्र आज मावळली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिलीप धोत्रे यांनी स्टार प्रचारकांच्या प्रचार सभांमध्ये बाजी मारली आहे पहिल्यांदाच राज ठाकरे यांच्या माध्यमातून स्टार प्रचारकाची पहिली सभा परवा दिवशी बुधवारी मंगळवेढा येथे संध्याकाळी सहा वाजता होत आहे. यावरून मनसे नेते राज ठाकरे हे पंढरपूर मंगळवेढा साठी किती गंभीर आहेत हे दिसून येते.

एकूणच राजकीय रणांगण तापले असून आजपासून प्रचार सभांचा धडाका सुरू होणार आहे.

## पंढरपुरात महाविकास आघाडीत बिघाडी
## चौरंगी लढत होणार !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडी कडून भगीरथ भालके व अनिल सावंत यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी दोघांपैकी कोणीतरी उमेदवारी अर्ज मागे घेईल असे वाटत होते. मात्र दोघांपैकी कोणीच उमेदवारी अर्ज मागे घेतले नसल्याने आघाडीत बिघाडी झाली आहे. महाविकास आघाडीचे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात राहिल्याने पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात चौरंगी लढत होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार




संघात विठ्ठल कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडे उमेदवारीची मागणी केली होती. मात्र उमेदवारी मिळण्यास विलंब होत असल्याने त्यांनी काँग्रेसच्या नेत्यांची संपर्क करून काँग्रेस कडून उमेदवारी आणून उमेदवारी अर्ज दाखल केला. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून अनिल सावंत यांना उमेदवारी देण्यात आली. यामुळे या मतदारसंघात महाविकास आघाडीचे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याचे दिसून आले. मात्र एकाला उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी नेत्यांकडून प्रयत्न करण्यात आली. मात्र भालके व सावंत यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले नसल्याने या मतदारसंघात महाविकास आघाडीचे दोन उमेदवार राहिले आहेत. यामुळे या मतदारसंघात भाजपचे आमदार समाधान आवताडे महाविकास आघाडीकडून भगीरथ भालके व अनिल सावंत तर मनसेकडून दिलीप धोत्रे यांचे उमेदवारी अर्ज असल्याने आता या मतदारसंघात चौरंगी लढत होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

### प्रचार शुभारंभ...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** समाधान महादेव आवताडे यांच्या प्रचार शुभारंभ माचणूर येथील ग्रामदैवत श्री.सिध्देश्वरच्या मंदिरामध्ये मा.श्री.आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला...!

## बुधवारी राज ठाकरे यांची मंगळवेढ्यात सभा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे बुधवार दिनांक सहा नोव्हेंबर रोजी दुपारी एक वाजता मंगळवेढा येथे येणार असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार दिलीप बापू धोत्रे यांच्या प्रचारार्थ सायंकाळी ६ वाजता मंगळवेढा शहरातील शिवप्रेमी चौक येथील आठवडा बाजार येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार दिलीप बापू धोत्रे यानी प्रचारात आघाडी घेतली असून महाराष्ट्रात सर्वात अगोदर त्यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यांनी प्रचाराचा धडाका चालवला असून आणि पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील सर्व गावे पिंजून काढत असून त्यांच्या सभांना प्रचंड मोठा प्रतिसाद मिळत आहे.

प्रत्येक गावातील सभांना त्यांच्या प्रचंड गर्दी होत असून विविध पक्षाचे, गटाचे कार्यकर्ते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये प्रवेश करत आहेत. त्यामुळे संपूर्ण मतदारसंघातील वातावरण मनसेमय झाले असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन प्रचार करत असून पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील सर्व प्रश्न मनसेचे उमेदवार दिलीप धोत्रे जनतेसमोर मांडत असून जनता ही त्यांच्या अडचणी वर चर्चा करत आहे. मनसेचे उमेदवार दिलीप

» पान ३ वर

## मी संतांच्या विचाराचा पाईक असल्याने तुमच्या सेवेला येत आहे ;आशीर्वाद द्या आणि उपकृत करा

### अनिल सावंत यांची खास मुलाखत

■ खास प्रतिनिधी



**पंढरपूर :**
जे का रंजले-गांजले, त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा ।।

या संत विचाराचा मी पाईक असून माझ्या गळ्यात बालपणापासून असलेली तुळशीची माळ हीच माझी कर्म सिद्धांताची अविष्कारी वृत्ती आहे. समाज सेवेचे घेतलेले व्रत हे मला संतांच्या विचारातून मिळालेले एक धन आहे आणि याची जोपासना करत करतच सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य , आर्थिक क्षेत्रात काम करत राहताना संतांचे विचार हेच माझे वैचारिक अधिष्ठान आहे. या अधिष्ठानाचे जतन व्हावे म्हणूनच राजकारणाच्या माध्यमातून मी पंढरपूर-मंगळवेढा संघात राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार म्हणून मतदारांच्या सेवेसाठी उभा राहिलो आहे असे भावनिक मन उघड करताना पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार अनिल सावंत यांनी दै. पंढरी संचार शी खास वार्तालाप करताना व्यक्त केले.

सोमवारी उमेदवारी अर्ज परत घेण्याची मुदत संपताच पहिल्यांदाच आपले मनत मतदारांच्या समोर उमेदवार अनिल सावंत यांनी व्यक्त केले.

पंढरपूरचा राजकीय इतिहास पाहिला तर गळ्यात तुळशीची माळ असलेला वारकरी सांप्रदायाचा अनुयायी असलेला आणि संतांच्या विचाराचे पाईकपण स्वीकारलेला मी कदाचित पहिला या मतदार संघातील उमेदवार असेल असे सांगून सावंत यांनी या मुलाखतीच्या व्दारे आपले मन मोकळे केले.

एका प्रश्नाला उत्तर देताना सावंत म्हणाले, भारतातील ज्येष्ठ नेते व माझे अत्यंतिक श्रद्धास्थान असलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार हे अत्यंतिक आदराचे स्थान मानतो. त्यांचा आदेश म्हणूनच मी या निवडणूकीच्या रिंगणात उतरलो आहे. पंढरपूर हे पवित्र तिर्थक्षेत्र आहे. या चंद्रभागेच्या तिरावर जाती-पातीची बंधनं झुगारुन संत ज्ञानेश्वरांच्या पासून ते संत चोखोबा महाराज यांच्या पर्यंत सर्वांनी हातात हात घालून विठ्ठलाचा पुकारा करत करत विश्वाच्या कल्याणाची अनुभूती आम्हाला द्या असा पुकारा केला. त्याच संतांच्या नगरीत मी आज उमेदवार म्हणून आपल्या समोर उभा आहे.

» पान ३ वर

## कार्तिकी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे
## 24 तास दर्शन सुरू राहणार - कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** कार्तिकी यात्रा दरवर्षी प्रबोधिनी शुध्द एकादशी या दिवशी भरते. सन 2024 यावर्षी कार्तिकी यात्रा दिनांक 12 नोव्हेंबर रोजी आहे. या यात्रेचा कालावधी दि.02 ते 15 नोव्हेंबर असा राहणार आहे. या यात्रेला भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. दरवर्षी कार्तिकी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, यात्रा कालावधीत चांगला मुहुर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना 24 तास दर्शन उपलब्ध करून देण्यात येते.

दिनांक 04 नोव्हेंबर रोजी चांगला दिवस असल्याने विधिवत पुजा करून सकाळी 7.30 वाजता श्रींचा पलंग काढण्यात आला असून, विठ्ठलाच्या मूर्तीच्या पाठीशी लोड व रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या देण्यात आला आहे. त्यामुळे श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे 24 तास मुखदर्शन, तर 22.15 तास पदस्पर्श दर्शन सुरू राहणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.



यावेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते.

श्रींचा पलंग काढण्यात आल्याने काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती इ. राजोपचार बंद होवून पहाटे 4.00 ते 5.00 या वेळेत नित्यपुजा, सकाळी 10.45 ते 11.15 पर्यंत महानैवेद्य व रात्री 8.30 ते 9.00 या वेळेत लिंबूपाणी / गंधाक्षता हे राजोपचार सुरू ठेवण्यात येत आहेत. दिनांक 04 ते 20 नोव्हेंबर (प्रक्षाळपुजा) पर्यंत 24 तास दर्शन उपलब्ध राहील. कार्तिकी यात्रेला सुरवात झाली असून, भाविकांची दर्शनरांगेत गर्दी वाढत आहे. परंपरेनुसार 24 तास दर्शन सुरू करण्यात आल्याने जास्तीत जास्त भाविकांना श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे दर्शन होणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

### सोलापूर दक्षिण मधून दिलीप माने यांची माघार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी दाखल केलेले माजी आमदार दिलीप माने यांनी आज निवडणुकीतून माघार घेतली आहे. त्यांनी अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा दिल्याची सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. आता या मतदारसंघात विद्यमान आमदार सुभाष देशमुख, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार अमर पाटील व धर्मराज काडादी यांच्यामध्ये तिरंगी लढत होईल असे चित्र आहे. उमेदवारी अर्ज माघार घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर श्री. माने यांनी बोलण्यास नकार दिला.

### भाजपने घेतला महाविकास आघाडीचा धसका ; प्रचारासाठी पंतप्रधान येणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. भाजपचे जास्त उमेदवार विजयी होण्यासाठी भाजपकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले आहे. यामुळे याचा धक्का घेऊन भाजपने विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रित केले आहे. 12 नोव्हेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी सोलापूर येथे भाजपचे सहा उमेदवाराच्या प्रचारासाठी प्रचार सभा घेणार आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले आहे. यामुळे विधानसभा निवडणुकीची तयारी जोमाने सुरू केली आहे. तसेच महायुतीनेही विधानसभा निवडणुकीत चांगले यश मिळविण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली आहे. या योजनेतून कोट्यावधी महिलांच्या बँक खात्यात रक्कम जमा झाली आहे. यामुळे महिला वर्गातून आनंद व्यक्त होत आहे. तसेच शेतकऱ्यांसाठी वीज बिल माफ करण्यात आले आहे. विविध योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. निवडणुकीत यश मिळविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. भाजपने निवडणूक प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रित केले आहे.

» पान ३ वर

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सुभाष देशमुख यांनी पाकणी येथे कॉर्नर बैठक घेत आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांशी संवाद साधला. मतदारसंघातील विविध विषयांवर चर्चा केली आणि निवडणुकीत विजयी करण्यासाठी विनंती केली. यावेळी सोनूपंत येलगुंडे, सूर्यकांत येलगुंडे, विश्वनाथ येलगुंडे, संजय सुरवसकर, राजेंद्र सुरवसकर, बालाजी शिंदे, बालाजी येलगुंडे आदी उपस्थित होते.

### श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदिपन

# श्री संत दामाजी पंतांचा आशिर्वाद असल्याने कारखाना संकटातून बाहेर- इंगळे महाराज

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा :** श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचा सन २०२४-२५ हंगामा करिता ३२ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदिपन समारंभ रविवार दि.०३/११/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजताचे शुभमुहुर्तावर ह.भ.प. सुधाकर इंगळे महाराज, राष्ट्रीय अध्यक्ष,अखिल भाविक सांप्रदाय वारकरी मंडळ, सोलापुर यांचे शुभहस्ते व धनश्री आणि सिताराम परिवाराचे संस्थापक, दामाजी साखर कारखान्याचे माजी चेअरमन शिवाजीराव काळुंगे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी कारखान्याचे माजी चेअरमन ॲड. नंदकुमार पवार, जिजामाता पतसंस्थेचे मार्गदर्शक रामकृष्ण नागणे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. बॉयलर प्रदिपन कार्यक्रमा निमित्त सकाळी १०.३० वाजता कारखान्याचे संचालक भारत श्रीधर बेदरे व त्यांच्या पत्नी सौ.आशा भारत बेदरे यांचे शुभहस्ते होम हवन व श्री सत्यनारायण महापुजा करण्यात आली. प्रमुख पाहुणे ह.भ.प. सुधाकर इंगळे महाराज यांनी मनोगत व्यक्त करताना सुरुवातीला बॉयलर अग्निप्रदिपन समारंभ पार पडल्याचे जाहीर केले. महान संत दामाजी पंताच्या नांवाने हा कारखाना असल्याने संत दामाजी पंतांचा आशिर्वाद या कारखान्यास आहे. या कारखान्यावर आजपर्यंत अनेक संकटे येवून गेली. संकटे येत असतात जात असतात. तरीही सर्व अडचणीवर मात करत संतदामाजी कारखाना आता बाहेर पडला आहे. जिवनाच्या परिक्षेत पास व्हायचे असेल तर संतांचा आशिर्वाद महत्वाचा असतो. साखर कारखाना चालविणे कठिण गोष्ट आहे. परंतु या संचालक मंडळाने काटकसरीने पारदर्शी काम करुन हा कारखाना उत्तम प्रकारे चालविला आहे. कारखान्याचे एक चाक शेतकरी तर दुसरे चाक कामगार आहेत. कारखान्याला अडचण असताना संस्था चालली पाहिजे व टिकली पाहिजे यासाठी सभासद व कामगारांनी सहकार्य केले पाहिजे. ऊस उत्पादक शेतकरी व कामगारांनी अडचणीचे काळात दामाजी कारखान्यासाठी योगदान दिल्याने हा कारखाना टिकला आहे. इतर कारखान्याचा ऊस दर न पहाता आपला कारखाना टिकला पाहिजे याचा विचारही ऊस उत्पादक शेतक-यांनी केला पाहिजे. चालू वर्षी संचालक मंडळाने ठरविलेले गाळपाचे उद्दिष्ट निश्चीत पार पडेल असा आशावाद व्यक्त करुन दोन वर्षे कारखाना चांगला चालविल्याबद्दल संचालक मंडळाचे अभिनंदन केले.

सदर प्रसंगी कारखान्याचे चेअरमन शिवानंद यशवंत पाटील म्हणाले, स्व. मर्दा वकील, स्व.रतनचंद शहा, स्व. चरणुकाका पाटील यांच्या दूरदृष्टीतून या कारखान्याची उभारणी झाली आहे. गेल्या गळीत हंगामामध्ये एफ.आर.पी.पेक्षा जादा दर शेतक-यांना दिलेला आहे. मागील हंगामाचे ऊस बिल, तोडणी वाहतूक बिल, पूर्णपणे अदा केलेले आहे. कामगारांचे पगारही दरमहिन्याला वेळेवर करीत आहोत. येणारा हंगाम हा आव्हानात्मक असून या गळीत हंगामामध्ये ५ लाख मे.टनाचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. गाळप हंगामासाठी परिपुर्ण अशी सर्व तोडणी वाहतुक यंत्रणा भरली आहे. यासाठी १७० ट्रॅक्टर, २०० डंपींग, १० हार्वेस्टर मशिन, २०० बैलगाडी असे नियोजन करुन १७ कोटी ॲडव्हान्स वाटप केलेला आहे. या हंगामात जास्तीत जास्त गळीत करुन इतर कारखान्याच्या बरोबरीने चांगला दर देण्यास हे संचालक मंडळ कटिबध्द आहे. माजी आमदार श्री प्रशांत परिचारक यांच्या प्रयत्नातून कारखान्यास रु.१४ कोटीचे अर्थसहाय्य मिळाले आहे. यातून अनेक बँकांची थकीत कर्जे भरण्याचे काम चालू आहे. शिवाय कामगारांचा मागील संचालक मंडळाचे कालावधीतील थकीत एक महिन्याचा पगार मागील १५ दिवसाखाली अदा केला आहे. कामगारांची दिवाळी गोडव्हावी यासाठी कामगारांना १७ दिवसांचा पगाराएवढा बोनस अदा केला आहे. दामाजी कारखान्याचे सर्वांगीण प्रगतीसाठी येणाऱ्या हंगामाकरिता आपला ऊसदामाजी कारखान्याचे गळीतासाठी पाठवुन सहकार्य करावे असे आवाहन चेअरमन श्री.शिवानंद पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षपदावरुन बोलताना धनश्री परिवाराचे मार्गदर्शक प्रा.शिवाजीराव काळुंगे म्हणाले, शासनाने १५ नोव्हेंबर पासून कारखाने सुरु करण्यास परवानगी दिली आहे. दामाजी कारखान्याची ऑफ सिझनमधील मशिनरी दुरुस्ती व सर्व्हीसिंगची कामे वेळेत पूर्ण केली आहेत. त्यामुळे कारखान्याचे सर्व कामगार अभिनंदनास पात्र आहेत. आज ह.भ.प. सुधाकर इंगळे महाराज या संतांच्या हस्ते दामाजी कारखान्याचा बॉयलर कार्यक्रम होत आहे. त्यामुळे हा गळीत हंगाम निश्चीतच यशस्वी होणार आहे. सहकारात पगार वेळेवर द्यावा लागतो. पगार वेळेवर झाला तर कामगार चांगल्या प्रकारे काम करीत असतो. हे संचालक मंडळ कामगारांचे पगार वेळेवर करीत आहे ही चांगली बाब आहे. ऊसाची रिकव्हरी वाढली पाहिजे. जेवढी रिकव्हरी जास्त तेवढा जादा ऊस दर देता येतो. दामाजी कारखान्याचा वजन काटा चोख असल्याने सभासदांचा दामाजीवर विश्वास आहे. त्यामुळे ठरविलेले ५ लाख गळीताचे उद्दिष्ट निश्चीतच गाठले जाईल असे ते शेवटी म्हणाले.

## अक्कलकोट विधानसभेसाठी पंचरंगी लढत?



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अक्कलकोट :** अक्कलकोट विधानसभा निवडणुकीसाठी यंदा पंचरंगी लढत होणार असे दिसते. मुख्य लढत महायुतीविरुद्ध महाविकास आघाडी अशी असली तरी मत विभागणीचा फटका कोणाला याची चर्चा आता जोरकसपणे तालुक्यात सुरू झाली आहे. दोन्ही प्रमुख पक्षांमध्ये सरळ लढत होण्याचे संकेत आहेत. आठ दिवसांपूर्वी अक्कलकोटची लढत दुरंगी किंवा तिरंगी होण्याचे संकेत मिळत असतानाच आजच्या घडीला ही निवडणूक पंचरंगी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे या मतदार संघात कोण निवडून येणार याकडे लक्ष लागले

## Selected

## उध्दव -राज एकाच दिवशी सोलापुरात



**सोलापूर :** महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीसाठी सोमवारी चित्र स्पष्ट होईल. यंदा महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी लढत पाहायला मिळत आहे. बऱ्याच ठिकाणी सर्वच पक्षांमधून बंडखोरी झाल्याचे पाहायला मिळते. उमेदवारांचा प्रचारार्थ राजकीय नेत्यांच्या तोफाही धडाडणार आहेत. सोलापुरात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे दोन्ही नेते आपल्या उमेदवाराच्या प्रचारार्थ सोलापुरात एकाच दिवशी येणार असल्याची माहिती समोर येत आहे.

## निवडणूक शांततेत पार पडावी म्हणून पथसंचलन



**सांगोला :** विधानसभा निवडणुकीच्या - अनुषंगाने निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी या पार्श्वभूमीवर केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या जवानासह पोलिसांनी सांगोला तालुक्यातील महूद, चिकमहुद व वाकी शिवणे गावात सशस्त्र पथसंचलन केले. यावेळी त्यांच्या समवेत सहायक पोलिस निरीक्षक अजित जाधव, पोलिस हवालदार चंद्रकांत बोधगिरे, पोलिस व पाटील प्रभाकर कांबळे सहभागी झाले होते. सांगोला विधानसभा निवडणुकीची में रणधुमाळी सुरू झाली आहे. विधानसभा निवडणूक शांततेत व निर्भय वातावरणात म्हणून हे पथसंचलन करण्यात आले.

## तालुक्यात राष्ट्रवादीला पुन्हा पालवी फुटेल



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बार्शी तालुक्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटांना पुन्हा पालवी फुटेल असे प्रतिपादन असे प्रतिपादन सुप्रिया गुंड यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट झाल्यापासून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला बार्शी तालुक्यामध्ये गळती लागली आहे. त्या पार्श्वभूमीवर सुप्रिया गुंड यांनी माध्यमांशी संवाद साधला. जेंव्हा विधानसभेचा निकाल लागेल त्यावेळी गेलेले कार्यकर्ते, पदाधिकारी व नेते पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात येतील.

## सामाजिक नेते कुमारदादा ढवळे प्रदिर्घ शासकीय सेवेतून सेवानिवृत्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** आंबेडकरी चळवळीतील सामाजिक अभ्यासक , फर्डे वक्ते श्री. कुमार ढवळे हे कालच त्यांच्या नोंदणी खात्याच्या शासकीय सेवेतून ब-याच प्रदिर्घ काळानंतर सेवानिवृत्त झाले. त्यांचा कार्यालयात खात्यातील अधिकारी श्री . पि.एस. निराळी सौ. देशमुख व कर्मचारी शासनाचे वतीने सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या मित्र मंडळाने सत्कार केला. श्री. ढवळे यांचा सामाजिक , शैक्षणिक व विविध क्षेत्रातील मित्र वर्ग ही बराच मोठा आहे. पंढरपूर येथील दुसऱ्या एका कार्यक्रमात पंचशील सेवाभावी मंडळ कराड नाका परिसरातील सिध्दार्थ विहारात ही मंडळाचे अध्यक्ष आर.पी. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला. रिपब्लिकन नेते जितेंद्र बनसोडे, मागाडे सर, पाटोळे सर , मुकुंद मागाडे , मोहन कडलाख मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## 254 माळशिरस विधानसभा निवडणुकीत बारा उमेदवारांमध्ये लढत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** २५४ माळशिरस (अ.जा.) विधानसभा मतदार संघातू दि ४/११/२०२४ रोजी माघारी उमेदवारी अर्ज घेण्याच्या दिवशी बारा उमेदवार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत तर तेरा नामनिर्देशन भरलेले उमेदवारांनी आपले अर्ज माघारी घेतले आहेत.

४/११/२०२४ हा अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस होता. बारा उमेदवार माळशिरस विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. यामध्ये उत्तमराव शिवदास जानकर (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट),राम विठ्ठल सातपुते (भारतीय जनता पार्टी),सूरज अशोक सरतापे (बहुजन समाज पार्टी),राज यशवंत कुमार (वंचित बहुजन आघाडी), प्रा.डॉ. सुनिल सुखदेव लोखंडे (राष्ट्रीय समाज पक्ष), अरूण मनोहर धाईंजे (अपक्ष),कुमार दादा लोंढे (अपक्ष),दादा विश्वनाथ लोंढे (अपक्ष), मनोजकुमार उत्तम सुरवसे (अपक्ष), रमेश अंकुश नामदास (अपक्ष), सुधीर अर्जुन पोळ (अपक्ष), त्रिभुवन विनायक धाईंजे (अपक्ष) हे बारा उमेदवार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.तर आज माघारी घेतलेले उमेदवार शैलेश जनार्दन कोतमीरे (अपक्ष), विकास संदिपान धाईंजे (अपक्ष), ज्ञानेश्वर मारूती काटे (अपक्ष),प्रा.डॉ.धनंजय तुकाराम साठे (अपक्ष),अतुल श्रीमंत सरतापे (अपक्ष),नागेश आबा जाधव (अपक्ष),प्रकाश वामन नवगिरे (अपक्ष),सोमनाथ अरूण भोसले (अपक्ष),मकरंद नागनाथ साठे (अपक्ष),नंदकुमार कृष्णाजी साळवे (अपक्ष),शरद गेना सावंत (अपक्ष),अनिल तानाजी साठे (अपक्ष), प्रेमसिंह ज्ञानदेव कांबळे (अपक्ष) या उमेदवारांनी आपला विधानसभा निवडणुकीतून आपले अर्ज माघारी घेतले.

निवडणूकीत उभे राहिलेल्या बारा उमेदवारांचे अर्ज ठेवण्यात आले असून त्यांना निवडणूक चिन्हाचे ही वाटप करण्यात आले अशी माहिती प्रांताधिकारी व निवडणूक अधिकारी श्रीमती विजया पांगारकर यांनी दिली. यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी सुरेश शेजुळ,नायब तहसीलदार अमोल कदम उपस्थित होते.

## जरांगे पाटलांच्या आदेशाचे तंतोतंत पालन करणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बार्शी :** आज अंतरवाली सराटी येथून मनोज जरांगे पाटलांचा जो आदेश निघेल, त्याचे बार्शी तालुक्यातील मराठा समाज तंतोतंत पालन करणार असल्याचे समाजाचे नेते आनंद काशीद यांनी जाहीर केले आहे. जरांगे पाटलांच्या मार्गदर्शना खाली मराठा समाज आपल्या हक्कासाठी ठामपणे उभा राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मनोज जरांगे जे सांगतील त्या आदेशाचे आम्ही काटेकोरपणे पालन करु. तसेच जर त्यांनी अर्ज ठेवा असे सांगितले तर आम्ही उमेदवारी अर्जसुद्धा ठेवून निवडणूक लढविणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## जानकरांच्या सभेत दगाबाजीचा आरोप



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** माळशिरस विधानसभा मतदारसंघात यंदा आ. राम सातपुते विरुद्ध उत्तम जानकर यांच्यात चुरशीची लढत सुरू आहे. मागच्या निवडणुकीत सातपुतेंना पाठिंबा दिलेल्या मोहिते-पाटील आता जानकरांच्या समर्थनात आहेत. लोकसभा निवडणुकीत भैय्या आणि आमदारकीसाठी जानकर यांच्यात तडजोड झाली होती. जानकरांनी अर्ज भरताना जयसिंह मोहिते-पाटील यांनी खासदारकीसाठी काहीजण दगा दिला, असा आरोप केला. या निवडणूकीत कोण विजयी होणार याकडे जनतेचे लक्ष लागून राहिले असल्याचे दिसून येत आहे.




गीर गाईचे शुद्ध दूध मिळेल. त्वरित संपर्क साधा

आयुर्वेद शास्त्राच्या मताप्रमाणे गीर गाईचे दूध हे ह्युमिनिटीप्रधान तसेच लहान बालकांसाठी अत्यंत उपयुक्त असे आहे.

## प्रतिकृती

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माळशिरस :** दिपवाळी निमित्त माळशिरस येथील वितराग दोशी,अपेक्षा दोशी,पार्श्व दोशी,तीर्थ दोशी यांनी तयार केलेल्या पद्मदुर्ग या किल्ल्याची प्रतिकृती... छाया - सौ.शोभा वाघमोडे, माळशिरस

गोपाळ क्लॉथ सेंटर




पत्ता- महाव्दार चौक, पंढरपूर (फोन नं.०२१८६-२२३१३३)

### मोहोळ विधानसभा मतदार संघात तिरंगी लढत होणार

# राजु खरे, यशवंत माने आणि संजय क्षीरसागर यांच्यात लढत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** प्रचंड उत्सुकता ताणली गेलेल्या मोहोळ मतदार संघात लोकसेवक संजय क्षीरसागर यांचा अर्ज राहिल्यामुळे महायुतीचे उमेदवार व विद्यमान आमदार यशवंत तात्या माने महाविकास आघाडीचे राजू खरे आणि शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे बंडखोर संजय क्षीरसागर यांच्यातच प्रामुख्याने तिरंगी लढत होण्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. मोहोळ मतदार संघात छाननी मध्ये काही अर्ज बाद झाल्यानंतर निवडणूक रिंगणात २७ अर्ज उरले होते. यादरम्यान अर्ज काढण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत प्रचंड घडामोडी तालुक्यात घडल्या . येथील माजी आमदार रमेश कदम आणि त्यांची मुलगी सिद्धी कदम यांना ऐन वेळेस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे चिन्ह मिळाले होते मात्र याविरुद्ध मोहोळ येथील सर्वपक्षीय मोहोळ तालुका संघर्ष बचाव समितीने उठाव करून थेट शरद पवार यांची त्यांच्या निवासस्थानी गोविंद बागेत जाऊन भेट घेतली होती . त्यावेळेस त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार अखेर राजू खरे यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा एबी फॉर्म मिळाला होता. पण यामुळे प्रचंड नाराज झालेला संजय क्षीरसागर यांनी बंडखोरी करण्याचा निर्णय कायम ठेवत आपला दबाव कायम ठेवला होता. ऐन दिवाळीचा सण सुरू असतानाही यशवंत माने यांच्याविरुद्ध एकच अर्ज राहावा यासाठी तालुक्यातील सर्व पक्ष नेतेमंडळी प्रयत्नशील होती. मात्र संजय क्षीरसागर यांना आपण अर्ज काढून घेतला तर यापुढे आपले राजकारण संपेल अशी भीती वाटल्याने सर्व विरोधातल्या मोठ्या नेत्यांचा दबाव जुगारून अखेर पर्यंत अर्ज काढला नाही. त्यांनी अर्ज काढावा यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार स्वतः राजू खरे,जिल्ह्याचे जेष्ठ नेते मनोहर डोंगरे,त्यांचे चिरंजीव आणि जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम समिती सभापती विजयराज डोंगरे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माजी प्रवक्ते उमेश पाटील, जिपचे माजी उपाध्यक्ष दीपक गायकवाड, उबाठा शिवसेनेच्या महिला आघाडीच्या संघटिका सीमा पाटील, आदींनी अहोरात्र प्रयत्न केले. या घडामोडी कडे तालुक्यातील मतदारांचे लक्ष लागले होते. रमेश कदम यांच्या मुलीचा फॉर्म बदलून तो राजू खरे यांना देण्यात अर्थपूर्ण घडामोडी घडल्याचे चर्चाही मतदारसंघात सुरू होती. या साऱ्या पार्श्वभूमीवर एकास एक लढत व्हावी असा प्रयत्न करणाऱ्यामधे माजी आमदार रमेश कदम व त्यांची कन्या सिद्धी कदम यांनीही अर्ज माघारी घेतली. मात्र संजय क्षीरसागर यांचा अर्ज राहिल्याने अर्ज करण्याच्या शेवटच्या दिवशी अखेर सर्वांचा अपेक्षा भंग झाला. संजय क्षीरसागर आणि त्यांचे कुटुंबीय १९९९ पासून लोकसभा आणि विधानसभा आणि वेगवेगळ्या निवडणुका लढवत आहेत. त्यांना आमदारकी अथवा खासदारकीची संधी मिळाली नाही, मात्र यामुळे त्यांच्याबद्दल एक सुप्त सहानुभूती मतदारसंघात आहे. विशेषत: मतदार संख्येत दुसऱ्या क्रमांकावर असलेला धनगर समाज बऱ्यापैकी त्यांच्या बाजूला आज तरी झुकल्याचे दिसत आहे. आणि मोहोळ अप्पर तहसील कार्यालयाचा मुद्दा विद्यमान आमदार यशवंत माने आणि माजी आमदार राजन पाटील यांना अडचणीचा ठरत असल्याचे चित्र असतानाच या नाट्यमय घडामोडीनंतर संजय क्षीरसागर यांचा अर्ज राहणे म्हणजे कोणासाठी धोक्याची घंटा आहे ? ते हळूहळू स्पष्ट होईल. अर्ज काढण्याच्या शेवटच्या दिवशी माजी आमदार रमेश कदम त्यांची कन्या सिद्धी आणि नागनाथ भाऊ क्षीरसागर या प्रमुख उमेदवारांसह १७ जणांनी माघार घेतली. शेवटच्या दिवशी रिंगणात राहिलेल्या उमेदवार आणि त्यांचे पक्ष याप्रमाणे: *बळीराम सुखदेव मोरे (बसपा ), राजू ज्ञानू खरे,राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार गट), नंदू बाबुराव क्षीरसागर( ब्ल्यू इंडिया पार्टी), नागनाथ देविदास क्षीरसागर(रासप), अमोल अभिमन्यू बंगाळे(अपक्ष), अनिल नरसिंह आखाडे (अपक्ष), कृष्णा नागनाथ भिसे (अपक्ष) सुरेश मधुकर थोरात (अपक्ष) व संजय दत्तात्रय क्षीरसागर (बंडखोर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार अपक्ष).

**सोलापूर :** मुलाने आई, सून, नात तसेच इतरांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना बुधवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास विजापूर रस्त्यावरील सैफुल येथे घडली. याप्रकरणी शांताबाई दत्तू राठोड (वय 58 राहणार द्वारकानगर, सैफुल विजापूर रोड, सोलापूर ) यांनी मुलगा रविकांत दत्तू राठोड (वय 41 राहणार द्वारकानगर, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ) यांच्या विरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## पुणे येथील माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठ यांचा पुढाकार

# देवभूमी उत्तराखंडच्या स्वर्गारोहण मार्गावर पाच पांडव आणि द्रौपदीच्या भव्य ब्राँझच्या मूर्त्यांची स्थापना

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** माणा गाव (जि. चमोली, उत्तराखंड) २६ ऑक्टोबर : देवभूमी उत्तराखंडमध्ये वसलेल्या माणा गावाचे सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सामरिक महत्व विलक्षण आहे. भारत आणि चीनच्या सीमेवर वसलेले भारतातील पहिले गाव माणा हे अत्यंत पवित्र ब्रदीनाथ धामच्या अगदी जवळ आहे. माणा गावाच्या उत्तरेला माता श्री सरस्वती नदीचा उगम होतो, जिच्या सान्निध्यात महर्षी वेद व्यासजींनी 'जय' नावाचा इतिहास म्हणजे 'महाभारत' श्री गणेशजींना सांगितला असे मानले जाते. कुरूक्षेत्राच्या भयंकर युद्धानंतर ३६ वर्षांनी भगवान श्रीकृष्ण वैकुंठाला गेल्यावर संकटात सापडलेल्या दुखी, झालेल्या पांडवानी आपले सिंहासन सोडून शारीरिक दृष्ट्या स्वर्गात जाण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर माणा गावातून स्वर्गारोहणाकडे जाणाऱ्या मार्गावरून सुमेरू पर्वताकडे निघाले होते. भारताच्या सांस्कृतिक वारशाच्या या अनोख्या घटनेच्या आजपर्यंत एकही स्मारक बांधण्यात आले नव्हते. परंतु पुणे येथील माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय शिक्षणतज्ञ, विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराडजींनी तीन वर्षापूर्वी मांडलेल्या संकल्पनेनुसार धर्मराज युधिष्ठिर, पराक्रमी गदाधारी भीम, शूर धनुर्धारी अर्जुन, नीतिमान नकुल व शांत, सज्जन सहदेव आणि राणी द्रौपदीसह शेवटपर्यंत युधिष्ठिराच्या सोबत राहिलेल्या श्वानरूपी यमराज त्यांच्या भव्य कांस्य मूर्ती बनवून स्वर्गारोहण मार्गावर बसवण्याचा निर्णय घेतला. काही तांत्रिक कारणांमुळे या मूर्ती इच्छित ठिकाणी बसवता आल्या नाहीत, मात्र या वर्षी दिवाळीच्या पूर्वसंध्येला माणा गावाचे प्रमुख श्री पीतांबरसिंह मोल्फाजी यांच्या सहकार्याने आणि माणाच्या सर्व ग्रामस्थांचा सहभाग ने त्यांची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. या मूर्त्यांना त्यांच्या निश्चित ठिकाणी बसविण्यासाठी एमआयटीचे व्यवस्थापक श्री. दिलीप पाटील, अभियंता श्री. विष्णू भिसे व त्यांच्या टीम ने प्रयत्न केले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे २०११ मध्ये माणा ग्रामस्थांच्या वतीने मुख्य प्रधान श्री पीतांबर सिंह मोल्फाजी यांच्या निमंत्रणावरून एमआयटी संस्थेने नदीच्या उगमस्थानी माँ. सरस्वतीजीचे सुंदर मंदिर अवघ्या काही कालावधीत म्हणजे ६३ दिवसात बांधल आहे. या 'श्री सरस्वती ज्ञान विज्ञान धाम' ची संकल्पना आदरणीय डॉ. विश्वनाथ कराड यांची आहे. याचे औपचारिक उद्घाटन महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भगतसिंग कोश्यारी जी यांच्या करकमलांनी, ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागाने मोठ्या उत्साहात पार पाडले. या सरस्वती मंदिराजवळ हवनकुंड आणि ध्यान केंद्र ही बांधण्यात आले आहे. माणा गावात बांधलेल्या या सुंदर धार्मिक अध्यात्मिक कलाकृतींमुळे माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या तीर्थ क्षेत्रांचे ज्ञान तीर्थक्षेत्रात रूपांतर करण्याच्या अनोख्या मोहिमेत महत्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. अशी माहिती जनसंपर्क विभागाने प्रसिद्धी केली आहे.

## कार्यालय सुरु केले; भाजपचे नेते नाराजच



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** करमाळ्यात महायुतीची उमेदवारी दिग्विजय बागल यांना मिळाली आहे. भाजपमधून ऐनवेळी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिग्विजय बागल यांच्या हाती 'धनुष्यबाण' दिले. बागल यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना भाजपाचे उपाध्यक्ष किरण बोकन, भाजयुमोचे प्रांतिक सचिव दीपक चव्हाण, जिल्हा प्रज्ञा सेलचे अध्यक्ष सुहास घोलप आदी उपस्थित होते. विलासराव घुमरे व दिग्विजय बागल दोन दिवसांपूर्वी चिवटेंकडे जाऊन आले. शिवाय जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार यांनी चिवटेंची मनधरणी केली.

» पान १ वरुन

## बुधवारी राज ठाकरे यांची....

धोत्रे हे गेले दीड महिना झाले प्रचार करत असून त्यांची एक फेरी पूर्ण झाली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर प्रचाराला सुरुवात केली असून पहिल्या टप्प्यातच पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील उमेदवाराची सभा घेत असून मंगळवेढा येथे ते आहेत.

राज ठाकरे यांनी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघांमध्ये वैयक्तिक लक्ष घातले असून गेल्या महिन्यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कुस्ती स्पर्धेस अमित ठाकरे हे उपस्थित राहिले होते. त्यावेळी पासून मनसेचे उमेदवार दिलीप धोत्रे त्यांच्या नावाची चर्चा संपूर्ण मतदारसंघांमध्ये सुरू झाली असून मनसेचे उमेदवार दिलीप धोत्रे यांनी बेरजेचे राजकारण करत प्रचाराला सुरुवात सुरुवात केली असून त्यानी नुकतीच उमेदवारी अर्ज भरताना हून्नूर येथील श्री बिरोबा, हुलजंती येथील महालिंगराया, मंगळवेढा येथे श्री संत दामाजी, संत चोखामेळा पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन पंढरपूर शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून उमेदवारी अर्ज भरला होता.

## भाजपने घेतला महाविकास...

सोलापूर जिल्ह्यात सहा विधानसभा मतदार संघात भाजपचे उमेदवार निवडणूक लढवीत आहेत. या उमेदवाराच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी 12 नोव्हेंबर रोजी सोलापूर येथील होम मैदानावर जाहीर सभा घेणार आहेत. या सभेत पंतप्रधान मोदी काय बोलणार याकडे लक्ष लागले आहे. एकंदरीत भाजपने महाविकास आघाडीचा धसका घेतला असल्याचे दिसून येत आहे.

# वंचितची महत्वपूर्ण बैठक



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** मार्ग फाऊंडेशनच्या मुख्य संपर्क कार्यालयात वंचित बहुजन आघाडी दक्षिण सोलापूर तालुका कार्यकारिणी, पदाधिकारी, सदस्यांची व बूथ कार्यकर्ता यांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत प्रचार दौऱ्याचे नियोजन, बूथ कमिटीचे गठन, जबाबदाऱ्यांचे वाटप आणि पक्षाचा जाहीरनामा प्रत्येक गाव, वाडी, वस्ती, तांड्यापर्यंत पोहोचवण्याचा निश्चय करण्यात आला. यावेळी दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील वंचितचे उमेदवार संतोष पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जुबेर फुलारी, निसार तांबोळी, असिफ यत्नाळ आदी उपस्थित होते. या बैठकीत निवडणुकी संदर्भात करावयाच्या कामाबाबत चर्चा करण्यात आली असल्याचे समजते.

# भेट...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**करमाळा :** करमाळा विधानसभा मतदारसंघात माजी आमदार नारायण पाटील यांना पाठींबा जाहीर केल्यानंतर माजी आमदार जयवंतराव जगताप व शरद पवार यांची इंदापूर येथे भेट झाली आहे. 'सोलापूर जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे सर्व उमेदवार चांगल्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी काम करा', असे पवार यांनी सूचित केले असल्याचे माजी आमदार जगताप यांनी बोलताना सांगितले आहे.

» Selected

# 14 उमेदवारांची माघार

## निवडणूक रिंगणात 24 उमेदवार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



विधानसभा निवडणुक २०२४

**पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी 14 उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. यामुळे निवडणूक रिंगणात 24 उमेदवार राहिले आहेत. या मतदार संघात चौरंगी लढत होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात किती जण उमेदवारी अर्ज मागे घेणार याकडे लक्ष लागले होते. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी 14 जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. यामुळे निवडणूक रिंगणात 24 उमेदवार राहिले आहेत. यात महायुतीचे आमदार समाधान आवताडे, महाविकास आघाडीकडून भगीरथ भालके, अनिल सावंत, मनसेचे दिलीप धोत्रे यांच्यात चौरंगी लढत होणार आहे. इतर वीस उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. महाविकास आघाडीकडून भालके व सावंत यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. शेवटच्या दिवशी या दोघांपैकी एक जण उमेदवारी अर्ज मागे घेईल अशी चर्चा होत होती. यासाठी नेते मंडळीकडून प्रयत्न करण्यात आले. मात्र आघाडीत बिघाडी झाली असल्याने दोघांनी उमेदवारी अर्ज ठेवले आहेत.

» पान १ वरुन

## मी संतांच्या विचाराचा पाईक असल्याने.....



विकास हा माझा ध्यास आहे आणि जाती-पातीपेक्षा माणूसकीवर प्रेम करणारा मी एक साधी कार्यकर्ता वारकरी आहे. विटेवरचा पाडुरंग, आळंदीचे ज्ञानेश्वर महाराज आणि इंद्रायणीच्या काठी असलेले देहुवासिय जगद्गुरु तुकाराम महाराज ही माझी दैवतं आहेत. या दैवताला स्मरुण मी मतदार संघात फक्त विकास आणि विकासाचा ध्यास घेऊन पवार साहेबांच्या आदेशाने उमेदवार म्हणून आपल्या समोर येत आहे.

पंढरपूर-मंगळवेढ्यातील विकास आणि याबाबतच्या आपल्या कल्पना काय आहेत? या प्रश्नाला उत्तर देताना अनिल सावंत म्हणाले, पंढरपूर ही कर्मभूमी आहे. या कर्मभूमीतली सेवा साक्षात विटेवरच्या विठ्ठलाची सेवा आहे. या भावनेतून मी असे सांगतो विकासाच्या नावावर आजपर्यंत पंढरपूरचा किती विकास झाला. का पंढरपूर भकास झाले याचा विचार मतदारांनी करणे गरजेचे आहे. भुकेल्या पोटाला चार घास सुखाचे मिळावे म्हणून लाखो तरुणांच्या हाताला काम मिळण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून या भक्तीच्या मळ्यात निर्माण होणारे उद्योग बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी झालेली आहे. पंढरपूर-मंगळवेढ्याचा औद्योगिक विकास हा माझ्या उमेदवारी समोरचा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. चार उद्योग निघाले तर १०० माणसं आणि शेकडो कुटुंबं जगू शकतात. यादृष्टीने औद्योगिक वसाहतीची स्वप्नपूर्ती मी कृतीत उतरवण्याचा निर्धार करुन माझ्या मतदारांच्या समोर आलेलो आहे. विकासाचे सामान्यांची प्रगती हे माझे स्वप्न नसून हा निर्धार आहे. विकासाचे भान आणि मतदारांची शान यासाठीच माझी उमेदवारी मी पणाला लावण्याचा संकल्प सोडलेला आहे.

अनिल सावंत पुढे बोलताना म्हणाले, पंढरपूरचा विकास, मंगळवेढ्याचा विकास ज्या गतीने व्हायला हवा होता तो होऊ शकला नाही हे वास्तव नाकारता येणार नाही. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजराथ, आंध्र, महाराष्ट्र, कर्नाटक आणि अन्य प्रदेशातून लाखो भाविक अत्यंतीक श्रद्धेनी पंढरपूरला येतात. पण त्यांच्या सोयी-सवलतीकडे मात्र फारशे दिले गेले नाही हे सत्य नाकारता येणार नाही. घोषणा पुष्कळ झाल्या पण अंमलबजावणी शून्य झाली. पंढरपूरच्या विकासाबाबत बोलताना सावंत यांनी आजही थोडासा प्रदक्षिणा मार्ग सोडला तर रस्त्याची दुरावस्था होताना दिसते. गल्ली बोळात कचऱ्याचे ढीग आज साचलेले दिसतात. जागोजागी गटारी तुंबलेली दिसतात. ही आरोग्य व्यवस्थेची दुरावस्था आहे. अधिक विस्तार करुन सांगताना सावंत म्हणाले, पंढरपूरात एकाच बुरडाची बाग होती. पण तिचे अस्तित्वच आज संपलेले दिसते. लहान मुलांनी खेळाचे-बागडायचे कुठे? यासाठी एक भव्य- दिव्य उद्यान उभा करुन वृक्ष संवर्धनाची भूमिका पार पाडण्याचा माझा संकल्प आहे. उपनगरात कांही ठिकाणी रस्त्याचा बोजवारा उडाला आहे तर कांही ठिकाणी उदा. मनिषानगर वगैरे भागात आता रस्त्याची कामे सुरु आहेत. उपनगरातून शहरात येण्यासाठी दळणवळणाची साधनं कमी पडतात. त्यासाठी बससेवा, रिक्षा स्टँड होणे गरजेचे आहे. कांही भागात पाणी पुरवठाही व्यवस्थित होत नसताना दिसून येतो. यावर तोडगे काढून विकासाभिमुख नगरे याला प्राधान्य देण्याचा प्रयत्न करणार आहे. उपनगरात एक स्वतंत्र स्मशानभूमी उभी राहणेही अत्यंत गरजेचे आहे. विकास आराखड्याच्याबाबत विशेषतः कॉरीडॉर संदभात स्थानिक नागरिकांना अनेक अडचणीचा सामना करावा लागणार आहे. १०-१० पिढ्या ज्या घरात राहिल्या त्यांचा आसराच उद्‌वस्त होणारा कॉरीडॉर आहे का ?. विकास झालाच पाहिजे पण त्या कुटुंबांना, मंदिराना, मठांना उध्वस्त करुन नको आहे.

नुकताच मी एक रोजगार मेळावा पंढरपूरात घेतला होता. त्यात ७०० लोकांना कायमस्वरुपी जगण्याची हमी मिळाली. आता दरवर्षी असे रोजगार मेळावे भरवून गरीब, कष्टकरी आणि कलाकारांच्या हाताला काम देण्याची भूमिका मी घेणार आहे. भुकेल्या पोटाला आश्वासनं नको आहेत तर त्यांच्या पोटात दोन घास जाण्याचे साधन त्यांना मिळाले पाहिजे असेही सावंत यांनी सांगितले.

पंढरपूर-मंगळवेढा शहरात शैक्षणिक हब निर्माण करण्याचा एक आराखडा तयार करण्यात येऊन त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

पंढरपूर-मंगळवेढा भागातील शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय होताना दिसते. कधी दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ यांच्याशी सामना करता करता कष्टाने पिकवलेल्या धानाला योग्य भाव मिळत नसल्याने या दोन्ही तालुक्यातील शेतकरी संकटात सापडलेला दिसतोय. त्यासाठी परिणामकारक उपाय योजना करण्याची हमी मी माझ्या शेतकरी बंधू-भगिनींना देतोय. ग्रामीण भागातला तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात शिक्षणासाठी पंढरपूरात येतो. त्यांच्यासाठी स्पर्धा शिक्षणासाठी स्वतंत्र सुसज्ज भव्य दानलाची निर्मती करण्याचाही संकल्प मी सोडला आहे. पंढरपूर मंगळवेढा तालुक्यात सामाजिक अभिसरणाचा प्रयोग राबवून प्रत्येक जाती-धर्माच्या कुटुंबाला सुखानं-समाधानानं जीवन जगता आले पाहिजे यासाठी पायाभूत सुविधा आणि उद्योग निर्माण करण्याची भूमिका मी घेतली आहे.

माझे आयुष्य संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांच्या शाश्वत विचाराने भारावलेले आहे. त्यामुळे जे बोलेल, जे करण्याचे आश्वासन देईन त्या कर्तव्यापासून मी क्षणभरही मागेपुढे पाहणार नाही. अनेक प्रश्न आहेत. पंढरपूरची चंद्रभागा, उजनीतील पाणी बंद झाले की ती कित्येक वेळा कोरडी पडते तिला कायमस्वरुपी पुरेशा जलसाठा राहावा म्हणून, भाविक भक्तांच्या स्नानाची व्यवस्था व्हावी म्हणून आणि कोळी बांधवांच्या उपजिविकेची साधन म्हणून होडीचालकांचे जीवन सुधारण्यासाठी चंद्रभागेत पाणी असणे गरजेचे आहे. त्यासाठीही प्रामाणिकपणे प्रयत्नशील राहणार आहे. या मुलाखतीच्या निमित्ताने मी आपल्यासमोर पहिल्यांदाच येत आहे. आपले आशीर्वाद हे संतांचे आशीर्वाद समजून आपली सेवा करण्याचे भाग्य आपण मिळवून द्यावे असे आवाहन आणि वारकरी सांप्रदायाच्या प्रथेप्रमाणे आपल्याला नमस्कार करुन करतो असेही श्री. सावंत यांनी सांगितले.

Shri Vithal Institute of Progressive Education's

Institute Of Computer and Management Studies, Kasegaon,Pandharpur.

(Accreditated by NAAC with 'B' Grade) NON-AIDED (Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur) Applications are invited for the following CLOCK HOUR BASIS (CHB) Post for the Academic Year 2024-25

| Sr. No. | Course | Sr. No | Subject | Designation | Total No. of CHB Post |
|---|---|---|---|---|---|
| Science & Technology Faculty | | | | | |
| 1 | B.Sc. (ECS) | 1 | Computer Science | Assistant Professor | 3 C.H.B. |
| | | 2 | Statistics | Assistant Professor | 1 CHB |
| | | 3 | English | Assistant Professor | 1 CHB |
| | | 4 | Electronics | Assistant Professor | 1 CHB |
| 2 | B.C.A | 1 | Computer Science | Assistant Professor | 4 C.H.B. |
| | | 2 | English | Assistant Professor | 1 CHB |
| | | 3 | Mathematics | Assistant Professor | 1 CHB |

1) The above Posts are open to all however candidates from any category can apply for the post.
2) All the above posts are purely on Temporary Clock Hour Basis for Academic Year 2024- 2025 & subject to workload approval of Joint Director of Education, H.E. Solapur Region, Solapur for Senior College section.
3) Educational Qualification and other requirements are as prescribed by the UGC Notification dtd. 18 July 2018, Govt. of Maharashtra Resolution No. Misc. 2018/C.R.56/18UNI-4dts. 8 March 2019 and University Circular No. PAHSUS/ Est/ 7pay/2019/2285/ dtd. 25th March 2019.
4) Remuneration of the above posts will be as per Govt. Resolution No. [illegible] dated 14 November 2018 and University Circular No. [illegible] dtd.24th December 2018.
5) Applications with full details should reach to the Principal Solapur Social Association's Solapur within 8 days from the date of publication of this advertisement. Incomplete applications will not be entertained.
6) This is University approved advertisement.

Principal




## हे मत मला नसून पवार साहेबांच्या तुतारीला

# पवार साहेबांच्या पाठीत ज्यांनी खंजीर खुपसला त्यांना जागा दाखवणार : पाटील

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माढा :** ज्यांनी पवार साहेबांच्या पाठीत खंजीर खुपसला, ऐनवेळी ज्यांनी पवार साहेबांची साथ सोडत सत्तेच्या मागे जाणे पसंत केले. शरद पवार यांचा पक्ष आणि चिन्ह हिरावून घेण्यासाठी ज्यांनी सह्या केल्या त्यांना जागा दाखवण्याची वेळ आली आहे. येत्या माढा विधानसभा निवडणुकीत तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हाला मतदान करा असे आवाहन अभिजीत पाटील यांनी काल देगाव, बिटरगाव अजूनसोंड येथील सभेत बोलताना केले. सध्या संपूर्ण राज्यभरात विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. अशातच अनेक मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशा थेट लढती पाहायला मिळत आहेत. यातील सर्वात रंगतदार लढत म्हणून माढा विधानसभा मतदारसंघांमध्ये पाहिले जात आहे. या मतदारसंघात सलग सहा टर्म आमदार असणाऱ्या बबनराव शिंदे यांना पंढरपूर येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत पाटील या एका शेतकरी पुत्राने थेट आव्हान देत जेरीस आणून सोडले आहे. तुतारी वाजवणारा माणूस या शरदचंद्र पवार गटाच्या चिन्हावर लढणाऱ्या अभिजीत पाटील यांचा सामना बबनराव शिंदे यांचे पुत्र रणजीत शिंदे यांच्यासोबत होणार आहे. काल अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ बिटरगाव,अजनसोंड व देगाव या गावात गावभेट दौरे आयोजित करण्यात आले होते. अभिजीत पाटील यांच्या बोलण्याच्या शैलीमुळे तसेच तुतारी चिन्हाबद्दल लोकांमध्ये असलेल्या प्रसिद्धीमुळे अभिजीत पाटील यांच्या गाव भेट दौऱ्यांना मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. यावेळी बोलताना अभिजीत पाटील यांनी सत्ताधारी गटाचा खरपूस समाचार घेतला, यावेळी बोलताना ते म्हणाले की माढा मतदारसंघात अनेक विषय जाणिवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात आलेले आहेत.गेल्या 30 वर्षात सत्ता असूनही यांना शिक्षण आणि आरोग्याचा प्रश्न सोडवता आलेला नाही. सोबतच यांनी 30 वर्षात जेवढा विकास केला नाही तेवढा विकास मला निवडून दिल्यास मी केवळ पाच वर्षात करून दाखवतो असे आवाहनही लोकांना केले. सोबतच ज्यांना पवार साहेबांनी मोठे केलं, ज्यांना गेले तीस वर्षात सत्तेत भागीदारी दिली, त्याच लोकांनी साहेबांची ऐनवेळी साथ सोडत विरोधात जाणे पसंत केले होते. मात्र आता निवडून येणे शक्य नसल्याचे त्यांना दिसू लागल्यानेच त्यांनी तुतारी मिळावी यासाठी पवार साहेबांची उंबरे झिजवले मात्र गेल्या 30 वर्षात कसलाच विकास न केल्यामुळे त्यांना तिथूनही रिकाम्या हाताने परत यावे लागले इथेच त्यांचा पराभव झाला असा घणाघात त्यांनी आ.शिंदे यांच्यावर केला. पवार साहेबांनी एका सामान्य शेतकरी कुटुंबातील पोराला उमेदवारी देऊन आशिर्वाद दिला आहे. अनेक वकत्यांनी बोलतांना सांगितले की दिलेला शब्द पाळणारा नेता म्हणून अभिजित पाटील यांची ओळख निर्माण झाली आहे. माढा मतदारसंघातील जनता अभिजीत पाटील म्हणजे अशेच किरण म्हणून पाहत आहेत.यावेळी अनेक प्रमुख मान्यवर तसेच शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते. अशा मध्येच 42 गावांमध्ये अभिजीत पाटील यांनी प्रचारामध्ये आघाडी घेतल्याचे दिसून आले.

# हा 'युटर्न नाही' फक्त सावध भूमिका !

आर्य चाणक्यांनी सांगितलेल्या सूत्रात राज्यकर्ते आणि रणांगणावरचे योद्धे यांना काही मार्गदर्शक तत्वे अंतःकरणात ठसवून घेण्याबाबत परकोटीचा आग्रह केला होता. ज्यांनी आग्रह स्वीकारला ते सम्राट अशोक झाले आणि ज्यांनी त्या आग्रहाचा तिरस्कार केला ते रणांगणात धोबीपछाड झाले. " मराठा आंदोलनाचे प्रखर योद्धे आणि मराठा समाजातील लेकरा-बाळांच्या उद्धारासाठी विचाराची तलवार हातात घेऊन सरकार दरबारी न्याय मागण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र ज्यांनी पेटविला ते महान योद्धे मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथून तसेच दसऱ्याच्या निमिताने नारायणगड येथील मेळाव्यात राजकीय विचारातून एक सूप्त संदेश जनतेला दिला आणि निवडणूकीची तुतारी फुंकली गेली. आज सोमवारी सकाळी या महान योद्धाने एक पत्रकार परिषद घेऊन मराठा समाजाच्या वतीने एकही उमेदवार उभा केला जाणार नाही. ज्यांना पाडायचे आहे त्यांना पाडू आणि ज्यांना विजयाची माळ घालायची आहे त्यांना ती माळ घालू." अशा पद्धतीचा निर्णय घेऊन त्यांनी अतिशय स्पष्ट शब्दात सांगितले." एका जातीच्या समाजावर निवडणूका लढविणे अशक्य आहे. म्हणून आज ज्यांनी-ज्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत त्यांनी तातडीने काढून घेण्याचे आदेश दिले." आणि इथेच आर्य चाणक्याच्या मार्गदर्शक तत्वाचे आणि सावधपणाच्या सूत्राचे अत्यंत बेमालूपणे मनोज जरांगे यांनी आदरपूर्वक स्वीकार करुन आपला निर्णय जाहीर केला. आर्य चाणक्य म्हणतात, " राजकीय भूमिका बजावत असताना किंवा रणांगणावर युद्ध करताना जो सावधपणा असायला हवा असतो त्याचा स्वीकार करणे गरजेचे असते. कारण त्यातच विजयाची नांदी दडलेली असते." छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरु समान असलेले श्री रामदास स्वामी यांनी सावधानतेबद्दल आपल्या ओव्यात अत्यंत मार्मिक विवेचन केलेले आहे.

मतितार्थ असा सावधानता याहीपेक्षा दूरदृष्टीचे परिणाम हे रणांगणावर पाऊल टाकण्यापूर्वी आवश्यतेनुसार त्याचा आदर केला पाहिजे हीच भूमिका मनोज जरांगे नावाच्या योद्धयाने घेतली. मराठा समाजातील सर्वच पक्षीय जाणकारांनी या योद्धयाच्या घोषणेने स्वागत केले. सुमारे एक महिन्यापुर्वी पुण्यातून प्रसिद्ध होणाऱ्या 'राष्ट्र संचार' या दैनिकाने आपल्या एका वृतात किंवा अग्रलेखात त्या संपादकांनी स्पष्टपणे नमूद केले होते. 'निवडणूकीच्या उमेदवारीबाबत जरांगे यांच्याकडून अशी कोणतीही कृती होऊ शकत नाही" असे स्पष्ट मत व्यक्त केले होते. ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांनी आपल्या उपोषणाच्या दरम्यान स्पष्टपणे आपले मत व्यक्त करताना सांगितले होते. "मनोज जरांगे हे निवडणुकीसाठी उमेदवार उभा करणार असल्याची भाषा करत असले तरी तुम्हाला मी ठामपणे सांगू शकतो एकही उमेदवार ते उभा करु शकणार नाहीत." संपूर्ण महाराष्ट्रात दै. राष्ट्रसंचार आणि ओबीसी नेते लक्ष्मण हाके या दोघांनीच या जरांगे यांनी घेतलेल्या निर्णयावर एक महिन्यापूर्वीच शिक्कामोर्तब केले होते.

सामाजिक भान आणि लोकशाहीतल्या अलिकडच्या काळात निवडणूकीच्या संदर्भात सिद्धांताची बदलेली परिभाषा याचे मर्म आणि आकलन मनोज जरांगे यांना झाले आणि त्यांनी स्वागताहार्य असा निर्णय आज जाहीर केला. या निर्णयाला काही राजकीय कंगोरे जरुर आहेत. कांही तज्ञांच्या मते राजकीय विश्लेषकांच्या मते असे दिसून येते की, तुतारीच्या चिन्हावर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची कोंडी होऊ शकते म्हणून हा निर्णय घेण्यात आला. याचा संबंध सरळ सरळ गोविंद बागेशी किती येतो हा चर्चेचा विषय होऊ शकतो. दुसरे असेही मत चर्चिले जात आहे. बहुसंख्य मतदार संघात मराठा उमेदवारांची संख्या अधिक जाणवते. मराठा संघटनेच्या उमेदवारीमुळे कदाचित मराठा मतांची विभागणी होईल आणि मराठेतर उमेदवार कदाचित विजयी होऊ शकतो असेही मत व्यक्त होताना दिसते. तिसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे ग्रामीण भागात राहणारा किंवा मराठा चळवळीत भाग घेणारा प्रामाणिक कार्यकर्ता हा धनिक असूच शकत नाही आणि हल्लीच्या लोकशाही सिद्धांताने नीती-अनीतीचा उंबरठा ओलांडल्यामुळे हे शिलेदार (उमेदवार) कमी पडू शकतात हे वास्तवही नाकारता येत नाही. याहीपेक्षा महत्वाचा मुद्दा म्हणजे ज्यांचे पाठबळ मराठा योद्धा मनोज जरांगे यांना मिळते त्या ग्रामीण भागातल्या विविध पक्षाच्या प्रामाणिक कार्यकर्त्यांचा हाच मतप्रवाह होता. आणि या चार सूत्राचा अभ्यास करुन गंभीरपणे विचार करुन मनोज जरांगे यांनी हा निर्णय घेतला असावा अशी शंका व्यक्त करायला मोठा वाव आहे.

मनोज जरांगे यांची मराठा समाजातील लेकरा-बाळांची आर्थिक उन्नती, शैक्षणिक प्रगती आणि वैचारिक सिद्धता सार्थ ठरली पाहिजे या पवित्र आणि शुद्ध भावनेनी पुकारलेले हे आरक्षणाचे युद्ध वास्तववादी विचाराचे सत्य आहे. अंतरवली-सराटी येथे राहणारा सामान्यातला सामान्य माणूस विश्वाच्या राजकीय पटलावर नावानिशी प्रसिद्धीला पावला हे जरांगे यांच्या सामाजिक भान असलेल्या विचाराचे प्रामाणिक सत्य मानले गेले पाहिजे. मनोज जरांगे यांनी भल्या-भल्यांना आपल्या घोषणेने ब्रिदाचा विचार करायला लावला. निवडणूकीच्या मैदानात उतरलेले सर्व जाती-जमातीचे उमेदवार कधी अंधारात तर कधी उजेडात , कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्षपणे जरांगे यांची भेट घेऊन त्यांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला. मनोज जरांगे यांनी सर्व जाती धर्माच्या नेत्यांना आणि मग ते साधू असोत, संत असोत, विचारवंत असोत किंवा हाफीसाहब असोत, दर्गा समातीची अध्यक्ष असोत, दलित असोत, वंचित असोत यांची मोट बांधण्याचा प्रयत्न केला. पण हा प्रयोग जरांगे कृतीत उतरु शकले नाहीत. याची कारणमिमांसा जरुर वेगळी असेल पण सर्व समाजाला बरोबर घेऊन त्यांच्यातूनही उमेदवार निवडण्याची भूमिका जरांगे यांनी बोलून दाखविली. आणि इथेच खरा युद्ध भूमीवर पाय टाकण्यापूर्वी मतभेदाचा जो खडा पडला ना तो इथेच. आणि म्हणून मनोज जरांगे यांनी निवडणूकीला एकही उमेदवार उभा करणार नाही ज्यांना पाडायचे असेल त्यांना पाडा आणि ज्यांना सत्तेवर बसवायचे असेल त्यांना विजयी करा. अशी घोषणा केली. याचा गर्भितार्थ सुद्धा तितकाच महत्वाचा आहे.

---

यंदा भारतासह जगातील अनेक देशांत अतिवृष्टी, महापूर, चक्रीवादळ, ढगफुटी, भूस्खलन यासारख्या घटनांची मालिका पाहवयास मिळाली आणि यात प्रचंड मनुष्य आणि वित्त हानी झाली. शिवाय लाखो हेक्टरचे पिक वाया गेले. भारतात बिहार, ओडिशा, पश्चिम उत्तर प्रदेश, राजस्थान, उत्तराखंड, केरळ यासारख्या राज्यात अतिवृष्टींमुळे आणि नैसर्गिक आपत्तीमुळे हातचे पिक गमवावे लागले आहे. अन्न आणि कृषी संघटनेच्या मते १९९१ ते २०२१ या काळात शेतकऱ्यांना पूर, चक्रीवादळ, ओला दुष्काळ, दुष्काळ, ढगफुटी, भूस्खलन यासारख्या घटनांमुळे तब्बल ३२१.६ लाख कोटींचा फटका सहन करावा लागला. या आपत्तीचा सर्वाधिक फटका भारतासह संपूर्ण आशिया खंडातील शेतकऱ्यांना बसला आहे. अन्कोणत्याही अन्य क्षेत्रात एवढे मोठे नुकसान पाहवयास मिळालेले नाही.

# निसर्गाचा मारा, शेतकरी बिचारा

यंदा भारतासह जगातील अनेक देशांत अतिवृष्टी, महापूर, चक्रीवादळ, ढगफुटी, भूस्खलन यासारख्या घटनांची मालिका पहावयास मिळाली आणि यात प्रचंड मनुष्य आणि वित्त हानी झाली आहे. शिवाय लाखो हेक्टरवरील उभी पिके वाया गेली आहेत. भारतात बिहार, ओडिशा, पश्चिम उत्तर प्रदेश, राजस्थान, उत्तराखंड, केरळ यांसारख्या राज्यात अतिवृष्टींमुळे आणि नैसर्गिक आपत्तीमुळे कृषीक्षेत्राचे प्रचंड नुकसान झाले आहे. केरळच्या वायनाडचा उल्लेख केला तर तेथे भूतो न भविष्यती अशी हानी झाली आहे. अशा घटनांमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून हवामान बदल आणि निसर्गाचे दोहन यांबाबत गांभीर्याने विचार करुन पर्यावरणपूरक उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. नैसर्गिक आपत्तीनंतर आपल्याकडे केंद्र आणि राज्य सरकारकडून मदतीचा ओघ सुरू होतो खरा, परंतु त्याचा फायदा किती गरजूंपर्यंत पोहोचतो, हे सांगण्याची गरज नाही. कोणत्या कारणांमुळे त्यांच्यापर्यंत मदत पोहोचत नाही, हे देखील सर्वांनाच ठाऊक आहे. भाजीपाला, अन्नधान्य, दूध उत्पादन करण्याची जबाबदारी उचलणाऱ्या शेतकऱ्यांची शोचनिय स्थिती आणखी किती काळ अशीच राहील याचे उत्तर आज कुणीही देऊ शकत नाही. सरकारच्या तुटपूंज्या मदतीतून शेतकऱ्यांना किती आधार मिळतो? भारतातच तर नाहीच. प्राचीन काळापासून आपल्या शेतकऱ्यांना आपण अन्नदाते म्हणतो. अस्मानी संकटाचा सामना करत, घाम गाळत, रात्रं दिवसं एक करून बळीराजा शेतीमालाचे उत्पादन घेतो आणि देशाचेच नव्हे तर जगाचे पोट भरतो. त्याच्यावर कोणत्या ना कोणत्या रुपाने येणाऱ्या संकटाची तीव्रता आणि गांभीर्य हे त्याला आणि त्याच्या कुटुंबाला ठाऊक असते. भारतासह जगभरातील शेतकरी सतत नैसर्गिक संकटाचा आणि अन्य समस्यांचा सामना करत आहेत. त्यामुळे आजघडीला कोट्यावधी जनता कृषी क्षेत्रातून बाहेर पडत असल्याचेही वास्तव आहे. यामागचे कारण म्हणजे बेभरवशाची होणारी शेती, नित्याचा तोटा आणि नैसर्गिक संकटांची वारंवारिता. दरवर्षी होणारे सुमारे १०.२ लाख कोटींचे नुकसान पाहून शेती नकोच अशी भूमिका घेण्याचा प्रवाह वाढत आहे.

अन्न आणि कृषी संघटनेच्या (एफएओ) अहवालानुसार, वाढत्या नैसर्गिक संकटामुळे जगभरातील शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणीत भर पडत आहे. या आर्थिक संकटामुळे बळीराजा उद्धवस्त होण्याच्या मार्गावर आहे. अहवालानुसार शेतकऱ्यांवरचे आर्थिक संकटांचे प्रमाण हे जगभरातील कृषी क्षेत्राच्या वार्षिक सकल उत्पन्नाच्या सुमारे पाच टक्के आहे. नैसर्गिक संकटांच्या घटना गेल्या तीन दशकांत वेगाने वाढलेल्या दिसून येत आहेत. अशा स्थितीत आगामी काळात शेतकऱ्यांना आणखी किती संकटाचा मुकाबला करावा लागेल? त्याची भरपाई कोण करून देणार? याविषयी अनिश्चितता आहे. शेतीतील लोकसहभाग हा जागतिक पातळीवरही कमी होत आहे. 'एफएओ'च्या आकडेवारीनुसार, सन २००० मध्ये सुमारे १०२.७ कोटी नागरिक म्हणजे जागतिक मनुष्यबळाच्या सुमारे ४० टक्के मनुष्यबळ कृषी क्षेत्रात सक्रिय होते, ते आता २०२१ मध्ये कमी होत २७ टक्क्यांवर आले. म्हणजे आता केवळ ८७.३ कोटी नागरिकांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे. भारतात बागायती जमिनीचे प्रमाण कमी होत आहे आणि हे चित्र भारतासारख्या कृषीप्रधान देशांसाठी चिंताजनक आहे. केंद्र आणि राज्य सरकारने याचा सारासार विचार करून शेती क्षेत्रात सक्रिय राहणाऱ्यांना मदतीसाठी पुढे येणे अपेक्षित आहे. या आधारे नैसर्गिक संकट आणि अन्य दुसऱ्या समस्यांमुळे पिकांची होणारी नासाडी किंवा कमी भावामुळे होणारे नुकसान यांची तीव्रता कमी होईल. ते कर्जाच्या विळख्यात अडकणार नाहीत आणि आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणार नाहीत.

अन्न आणि कृषी संघटनेच्या 'स्टॅटिस्टिकल्स ईअर बुक: वर्ल्ड फूड अँड ॲग्रीकल्चर २०२३' च्या मते १९९१ ते २०२१ या काळात शेतकऱ्यांना पूर, चक्रीवादळ, ओला दुष्काळ, दुष्काळ, ढगफुटी, भूस्खलन यासारख्या घटनांमुळे पिकांचे नुकसान आणि पशुधनाची हानी असा एकूण तब्बल ३२१.६ लाख कोटींचा फटका सहन करावा लागला. या आपत्तीचा सर्वाधिक फटका भारतासह संपूर्ण आशिया खंडातील शेतकऱ्यांना बसला. ही अपरिमित हानी आहे. कोणत्याही अन्य क्षेत्रात एवढे मोठे नुकसान पहावयास मिळालेले नाही आणि असले तरीही संबंधित देशातील सरकार त्यांच्या पाठीशी उभे राहून आधार देताना दिसते.

**नवनाथ वारे, कृषीअभ्यासक**

विशेष म्हणजे अन्य सेक्टरमध्ये काम करणाऱ्या एखाद्या व्यक्तीला तोटा सहन झाल्यास सरकारकडून तात्काळ मदत केली जाते. परंतु भारतात शेतकऱ्यांना भरपाई देताना लालफितीचा कारभार आडवा येतो. एका अहवालानुसार, भारतासह आशियातील शेतकऱ्यांचे गेल्या तीन दशकांत नैसर्गिक आपत्तीसह विविध कारणांनी सुमारे १४३.३ लाख कोटींचे नुकसान झाले आहे. पण क्षेत्रफळानुसार अमेरिका, युरोपला अधिक फटका बसला आहे. त्याचवेळी कृषी क्षेत्राच्या जीडीपीच्या दृष्टीकोनातून विचार केला तर नैसर्गिक संकटात आफ्रिकेतील शेतकऱ्यांना सर्वाधिक नुकसान सहन करावे लागले आहे. यावरून एक बाब स्पष्ट होते आणि ती म्हणजे नैसर्गिक संकट केवळ भारतीय शेतकऱ्यांसाठीच नाही तर जागतिक पातळीवर देखील शेतकऱ्यांना हानीकारक ठरत आहे. म्हणूनच याबाबत वैश्विक पातळीवर सखोल मंथन करणे गरजेचे आहे आणि जागतिक पातळीवर सर्वसमावेशक धोरण तयार करण्याची गरज आहे. त्याआधारे शेतकऱ्यांचा नैसर्गिक आपत्तींच्या तडाख्यापासून बचाव होईल आणि योजनेच्या मदतीने शेतकऱ्यांना तातडीने मदतही मिळेल. एका सर्वेक्षणानुसार, शेतीचा खर्च हा पूर्वीच्या तुलनेत कैक पटींनी वाढला आहे. पण त्यातुलनेत उत्पन्न न वाढल्याने भारतातील कोट्यवधी शेतकरी वर्षातील बाराही महिने कर्जबाजारी राहतात. केंद्र अणि राज्य सरकारकडून सकारात्मक आणि सर्वसमावेशक धोरण नसल्याने लाखो शेतकरी एकीकडे आर्थिक आघाडीवर पेचात असताना दुसरीकडे कौटुंबीक अडचणीतही अडकलेले असतात. डॉ. स्वामीनाथन कमिटीचा अहवाल आजही लागू झालेला नाही. त्यामुळेच भारतातील कोणत्याच राज्यातील शेतकरी हा समाधानी नसल्याचे दिसून येते. शिवाय यात भरीस भर म्हणून तरुणांकडून शेतीकडे पाठही फिरविली जात आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने कोणतेही ठोस पाऊल उचलले दिसत नाही. 'एफएओ'च्या अहवालानुसार, भारतातील कृषी खाद्य प्रणालीतील अप्रत्यक्ष खर्च हा ९१ लाख कोटी रुपये आहे. त्याचवेळी जागतिक पातळीवर खाद्य प्रणालीवरचा अप्रत्यक्ष खर्च हा १,०५७.७ लाख कोटी रुपये आहे. यात भारताचा वाटा ८.८ टक्के आहे. याप्रमाणे खर्चाच्या आघाडीवर भारताचा अमेरिका आणि चीननंतर तिसरा क्रमांक लागतो. कृषी क्षेत्रातील वाढता अप्रत्यक्ष खर्च हा शेतकऱ्यांसाठी सर्वाधिक चिंतेचा विषय आहे. यासाठी सरकारने कृषी तज्ज्ञांचा सल्ला घ्यायला हवा आणि धोरण आखायला हवे.

रासायनिक किटकनाशकांचा वापर हा पर्यावरण प्रदूषणाचे एक प्रमुख कारण आहे. याखेरीज ग्रीनहाऊन गॅसमुळे नैसर्गिक संकटांचे प्रमाण वाढत असून ऋतूचक्रच बदलताना दिसून येत आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम पिकपाण्यावर होत आहे. तसेच अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होत असून रोगराईचा फैलाव होत आहे. याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. रासायनिक किटकनाशकांमुळे अन्नधान्यांचे उत्पादन अणि फळांत हानीकारक तत्वे आढळून येत असल्याचे चाचणीतून आढळून आलेले आहे.

एफएओच्या अहवालानुसार, भारतासह आशियायी देशात गेल्या दोन दशकांत किटकनाशकांच्या वापरात सुमारे ६२ टक्के वाढ झाली. याला पर्याय म्हणून जैविक (सेंद्रिय) किटकनाशकांचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना देण्यात येणारे प्रोत्साहन उपयुक्त आहे. पण त्याचा प्रचार-प्रसार आणि उपलब्धता कमी आहे. किटकनाशकांचा बेसुमार वापर होत असल्याने जमिनीतील शुष्कपणा वाढत आहे आणि उत्पादकता कमी होत आहे. तसेच पर्यावरणावर याचे भयावह दुष्परिणाम होत आहेत. तोच प्रकार रासायनिक खतांचा आहे. भारतात हरिक्रांतीनंतर सुरू झालेला रासायनिक खतांचा बेसुमार वापर जमिनीच्या नापिकीपासून कर्करोगाच्या फैलावापर्यंत दाहक झाला आहे. भारतीय शेतकरी विकसित देशांतील शेतकऱ्यांच्या तुलनेत खूपच गरीब आहे. आपल्याकडील शेतकऱ्यांना अन्य देशांतील शेतकऱ्यांच्या तुलनेत कमी मदत मिळते. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारने प्राधान्य देत शेतीला तोट्यातील क्षेत्रातून बाहेर काढत ती फायद्याची करण्यासाठी परिणामकारक पावले उचलण्याची गरज आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अंदाजानुसार भारताची लोकसंख्या २०३० ते २०४० पर्यंत १.५ ते १.५९ अब्जांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे जर विकसित भारत सर्वसमावेशक भारत बनवायचा असेल तर शेतीचा पूर्ण क्षमतेने विकास केला पाहिजे. उत्पादकता वाढणे आवश्यक आहे, पाण्याचा वापर कमी करणे आवश्यक आहे, भूजल पुनर्भरण गरजेचे आहे, मातीची झीज रोखणे आवश्यक आहे आणि शेतीतून हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणेही गरजेचे आहे. मातीच्या पोषक तत्त्वांचा वापर सुधारणे आणि त्याद्वारे कृषी उत्पादकता वाढवणे गरजेचे आहे. शेतकऱ्याचा माल पिकविल्यानंतर तो ग्राहकांपर्यंत पोहोचेपर्यंतची जी पुरवठा साखळी असते त्यात आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव असल्याने दरवर्षी सुमारे कोट्यवधी रुपये किमतीच्या शेतीमालाची नासाडी होतेय. साठवणुकीसाठी पुरेशा सुविधा उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांना कमी किमतीत शेतीमाल विकावा लागतो.भारतातील एकूण अन्न उत्पादनापैकी केवळ १० टक्क्यांपेक्षा कमी उत्पादनांची प्रक्रिया होते आहे. या सर्व समस्यांबाबत काही उपाययोजना सुरू असल्या तरी त्यांचा वेग कमी आहे. तो वाढल्याखेरीज अन्नदात्याची शोकांतिका संपणार नाही. ■

---

## गुड मॉर्निंग

दिवसाची अपूर्व सुरुवात

**पंचांग**

**मंगळवार, दिनांक ५ नोव्हेंबर २०२४**
कार्तिक शु. ४, ज्येष्ठा
श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१,
अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू
विनायक चतुर्थी, अंगारक योग, मराठी रंगभूमी दिन
**नक्षत्र** : ज्येष्ठा योग : अतिगंड, करण : वनिज.
**सूर्योदय :** स.०६.२१ सूर्यास्त : सायं. ०५.३३ वा.
**राहू काळ :** दुपारी : ३:०० ते ४:३०

**दिनविशेष**

▶१६७९: मराठे व इंग्रज आरमारात खांदेरीजवळ लढाई इंग्रजांनी प्रथमच मराठी आरमाराचे या युद्धात नुकसान केले. ▶१८१७: दुसरे बाजीराव आणि इंग्रज यांच्यातील प्रसिद्ध अशा खडकीच्या लढाईची सुरूवात. ▶१८४३: मराठी रंगभूमी दिन. ▶१८४३: विष्णूदास भावे यांच्या 'सीता स्वयंवर' नाटकाचा पहिला प्रयोग. ▶१९२९: जी.आय.पी. रेल्वे कंपनीच्या गाड्या मुंबई पुणे मार्गावर विद्युतशक्तीवर धावू लागल्या. ▶१९३१: महात्मा गांधी आणि राजे जॉर्ज यांची इंग्लंडमध्ये भेट. ▶१९३४: थिऑसॉफिकल सोसायटीच्या ॲनी बेझंट यांचे निधन. ▶१९५०: सुप्रसिद्ध गायक फय्याझ खॉं साहेब यांचे निधन. त्यांना चतुरंग गवई असे म्हटले जाते. ▶१९८५: सुप्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेते संजीव कुमार स्मृतिदिन ▶१९९२: लोककवी रामचंद्र नारायण पवार यांचे सोलापूर येथे निधन. ▶१९९२: ज्येष्ठ नाट्यकर्मी जयराम शिलेदार यांचे निधन. ▶१९९५: ज्येष्ठ अभिनेते शरद तळवळकर यांना आद्य मराठी नाटककार विष्णूदास भावे गौरवपदक प्रदान करण्यात आले.

**राशीभविष्य**

▲ **मेष** : आनंददायक दिवस. ▲ **वृषभ** : ओळखीतून लाभ होईल. ▲ **मिथुन** : आर्थिक बाजू नाजूक राहील ▲ **कर्क** : आवडत्या व्यक्तींशी भेट होइल. ▲ **सिंह** : कामात गुप्तता राखा. ▲ **कन्या** : नशीब साथ देईल. ▲ **तुळ** : चांगली बातमी कळेल. ▲ **वृश्चिक** : महत्वाचे निर्णय घ्याल. ▲ **धनु** : धनलाभ होईल. ▲ **मकर** : स्वयंपूर्णतेने कामे कराल. ▲ **कुंभ** : नको त्या कामात वेळ जाईल. ▲ **मीन** : स्वकमाई जादा फायदा दाईल.

**चिंतन**

इंद्रियांच्या नादी लागणे म्हणजे दीनवाणोपणा पत्करणे. त्यांचे कधी समाधान झाले नाही, तर ती तुमचे काय समाधान करणार? स्वप्नातले धन, मृगजळाचे पाणी, ढगांची सावली आणि इंद्रियांचा आधार ही सारी सारख्याच किंमतीची. म्हणून माणसाने त्या सगळ्याचा नाद सोडून अंतरात्म्यातील जीवनधारा जाणली पाहिजे.

**व्यक्तीविशेष**

### जयराम शिलेदार

संगीत नाट्यकलेचे शिलेदार जयराम शिलेदार यांचा आज स्मृतिदिन. ६ डिसेंबर १९१५ रोजी बेळगांव येथे त्यांचा जन्म झाला. शाहीर राम जोशी हे त्यांच्या कारकिर्दीला कलाटणी देणारे वळण ठरले. 'सुंदरा मनामध्ये भरली' या लावणीने त्यांचा रंगेल कवी जाहीर रसिकांच्या मनात घर करून राहिला. गडकऱ्यांच्या 'पुण्यप्रभाव'मधील त्यांची भूपालची भूमिकाही अविस्मरणीय ठरली, 'मराठी रंगभूमी' ही नाट्यसंस्था त्यांनी १९४९ रोजी स्थापन केली. संगीत सौभद्र, मानापमान या नाटकांचे प्रयोग महाराष्ट्र, कर्नाटक वगैरे भागात त्यांनी केले. आज या नाट्यक्षेत्रात शिलेदार घराणे हे स्वतंत्र दालन आहे. 'सूरसंगत' हे त्यांचे आत्मचरित्र. काही चित्रपटातही त्यांनी भूमिका केल्या.

**बोधकथा**

### दुसऱ्याला नावं ठेवताना...

एका जंगलात एक उंट रहात होता. त्याला नेहमी दुसऱ्यांना नांवे ठेवण्याची सवय होती. आपल्या बोलण्यामुळे दुसऱ्याला काय वाटत असेल याचा तो कधीही विचार करत नसे. एकदा तो फिरत फिरत गाईकडे गेला आणि गाईला म्हणाला ''ए तुझ्या बरगड्या बघ कशा दिसत आहेत आणि तुझ्या अंगावरचे वेगळ्या रंगाचे डाग किती विचित्र दिसत आहेत''.

हे ऐकून गाईला खूप वाईट वाटले. उंट नंतर म्हशी जवळ गेला आणि तिला म्हणाला, ''ए तुझ्या रंगाकडे बघ किती घाणेरडा आहे. तुला तयार करताना निर्माता अतिशय काळ्या म्हणजेच वाईट मन:स्थितीत असेल म्हणून तू अशी बनली आहेस''.

असं म्हणून हसत हसत उंट पुढे खारुताईकडे गेला तिला म्हणाला, ''ए छोट्याशा गरीब जीवा तुझ्याकडे बघून असं वाटती की, तू कुठल्याही क्षणी चिरडली जाऊ शकतेस. तुझ्या पाठीवरच्या या रेषा किती वाईट दिसत आहेत.'' खारुताईला हे ऐकून खूपच वाईट वाटले. उंट नंतर फिरत फिरत हत्ती जवळ गेला आणि त्याला म्हणाला, ''नक्कीच तुला बनवताना निर्माता मोठ्या मजेशीर मन:स्थितीत असेल. (पूर्वार्ध)

**जिज्ञासा**

### कृत्रिम किरणोत्सर्गी मूलद्रव्यांचा शोध

मारी क्युरी यांचे जावई जॉ फ्रेड्रीक ज्योलीओत यांचा जन्म १९ मार्च १९०० मध्ये फ्रान्स येथे झाला. लहानपणापासूनच क्युरी दांपत्यांचे प्रयोग दाखविणारे छायाचित्र त्यांना स्फूर्ती द्यायचे. दहा वर्षांचे असतानाच ज्योलीओत निरनिराळ्या रसायनांवर प्रयोग करत असत. त्यांनी रसायनशास्त्र आणि पदार्थविज्ञान या विषयात उच्च शिक्षण घेतले. १९२५ मध्ये त्यांनी मारी क्युरी यांच्या रेडियम संस्थेत नोकरी मिळवली. त्यांच्याबरोबर संशोधन करण्याचे स्वप्न पूर्ण केले. तिथेच क्युरी यांची मुलगी इरेन यांच्याशी ओळख होऊन पुढे दोघांनी विवाह केला. इरेन क्युरीचे पिता पेरी क्युरी यांचे अकाली निधन झाल्यानंतर त्यांचे उर्वरीत संशोधन निद्रहाने पुढे सुरु ठेवण्याचा निश्चय त्यांनी केला. किर्णोत्सर्गी मुलद्रव्यांमधून बाहेर पडणाऱ्या गॅमा किरणांद्वारे पॉझिट्रॉन या मुलकणांची निर्मिती कशी होते. यासंबंधी त्यांनी इरेन सोबत संशोधन केले. अल्फा किरणांचा मारा मुलद्रव्यांच्या अणूकेंद्रावर केला तर त्यातून न्युट्रॉन आणि पॉझिट्रॉन कण बाहेर फेकले जातात.
(पूर्वार्ध)

**सामान्यज्ञान**

### स्ट्रॉ वाटे पेय तोंडात कसे खेचले जाते?

त्यासाठी एक सोपा प्रयोग करून बघा. पेयाच्या बाटलीला झाकण लावून ती बंद करा आणि झाकणामधून केवळ स्ट्रॉ आत जाईल एवढेच भोक पाडा. स्ट्रॉ घालून आता पेय ओढण्याचा प्रयत्न केला तर बाटलीतील पेय स्ट्रॉवाटे तोंडात येणार नाही. फुफ्फुसातील आकुंचन प्रसरण येथे उपयोगाचे ठरत नाही. कारण पेय वर खेचण्यासाठी आपण फुफ्फुसाचे प्रसरण केले की आपल्या तोंडातील हवेचा दाब कमी होतो. परिणामी, स्ट्रॉमधील हवेचा दाबही कमी होतो. **(क्रमश:)**

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ४८९**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | | 4 | |
| 4 | | 1 | 3 |
| 1 | 3 | | |
| | | | 1 |

**क्रमांक ४८८ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 3 | 1 | 4 |
| 4 | 1 | 3 | 2 |
| 3 | 2 | 4 | 1 |
| 1 | 4 | 2 | 3 |

**हास्यविनोद**

संताला अमेरिकेला जाण्याचे विमानाचे तिकिट मिळाले. त्याने एअरपोर्टवर फोन केला आणि विचारलं, 'पंजाबहून अमेरिकेला जायला किती वेळ लागेल?' तेथील रिसेप्शनिस्ट म्हणाली, 'जस्ट ए मिनिट सर'. संता म्हणाला, 'ओके थँक्यू.'



**शिक्षक** – 'राग आणि संताप यातील फरक कोण सांगू शकेल?
**मोहन** – 'गुरूजी, मी सांगतो. राग नेहमी बाहेर हिंडत असतो आणि संताप घरातच जवळजवळ असतो. आमचे बाबा रागावले की ते घराबाहेर चालते होतात आणि आई संतापली की घरातच आदळ–आपट करायला सुरूवात करते.

**महिलायन**

### ब्लिच घरी करण्यापूर्वी...

कारण पावडर जास्त वापरल्यामुळे त्वचेचे नुकसान होण्याची शक्यता असते. ब्लिच केल्यानंतर चेहऱ्यावर पांढरे डाग दिसल्यावर ब्लिचिंग पावडर जास्त प्रमाणात वापरली गेली असे समजावे. कुठल्याही कंपनीचे ब्लिचिंग कीट वापरण्यापूर्वी त्यावरील सूचना अतिशय बारकाईने वाचाव्यात. म्हणजे योग्य ती काळजी घेणे सोपे जाते. ब्लिचिंग क्रीम चुकूनही डोळ्यात जाऊ देऊ नये. म्हणून ते डोळ्याच्या खालच्या त्वचेबाहेरून लावावे. किटवर सांगितलेल्या वेळेनुसारच चेहरा धुवावा. जास्त वेळ क्रीम चेहऱ्यावर लावून ठेवू नये. तसेच गरम पाण्याने आंघोळ केल्यानंतर लगेच ब्लिचिंग करू नये किंवा ब्लिचिंग केल्यानंतर लगेच उन्हातही जावू नये. शिवाय त्यानंतर साबणाचा वापरही एक दिवस टाळावा. चेहऱ्याप्रमाणेच आपण हातालादेखील ब्लिच करू शकतो. पण, त्यासाठी खूप जास्त ब्लिचिंग पावडर लागते. तेवढा खर्च करायचा नसेल तर हाताची त्वचा उजळण्यासाठी आणि मुलायम बनण्यासाठी इतरही पर्याय आहेत. दोन मोठे चमचे पपईच गर घेऊन त्यात दोन लहान चमचे मध मिसळावे. त्यात थोडी साखर घालून या मिश्रणाने हाताला मालिश करावी. त्यानंतर कोमट पाणी घेऊन हात धुवावे. आणखी एक पर्याय असून आंघोळ करण्यापूर्वी कोमट दुधाने हाताला मॉलिश करावी. त्यामुळे हाताची त्वचा उजळते आणि मुलायम बनते. एक केळ कुस्करून त्यात लिंबाचा रस घालावा. ही पेस्ट हातासोबतच चेहऱ्यालाही लावता येते. दहा मिनिटांनी हे पाण्याने धुवून टाकावे. यामुळे त्वचेची चमक वाढते. अशा रितीने छोट्याशा पण घरगुती उपायांनी आपण त्वचा उजळवू शकतो. (उत्तरार्ध)

**बालांगण**

### भूगोल

#### विषुववृत्तीय आर्द्र पानझडी वने

सुमारे १२५० ते १९०० मिलीमीटर पर्जन्यमान असणाऱ्या क्षेत्रात ही वने आढळतात. सह्याद्रीच्या पूर्वेकडील प्रदेश, उत्तरेकडील तराईचा भाग व मध्य भारत आणि पूर्वेकडील काही प्रदेश यांमध्ये आढळणाऱ्या या वनप्रकारातील वनस्पती आणि वृक्षरचना ही बहुधा द्विस्तरीय असते. यामध्ये मध्य व पश्चिम भारतात सागवान आणि पूर्व व उत्तर भागांमध्ये साल या प्रसिद्ध आणि मौल्यवान वृक्षजाती आढळतात. यांखेरीज, बेहडा, धावडा, बिबळा, सूर्या, नाणा, हिरडा, हेदी, जांभूळ या इतर प्रमुख वृक्षजाती तसेच बांबू आणि अनेक तऱ्हेची झुडपे व औषधी वनस्पतीही येथे वाढतात. मौल्यवान लाकडे, सुगंधी आणि औषधी द्रव्ये या वनांमधून मिळतात. महाराष्ट्रात हा वनप्रकार मुख्यतः ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, पुणे, नाशिक, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांच्या काही भागात आढळतात.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

## मृतांची संख्या वाढण्याची भीती

# उत्तराखंडात बस दरीत कोसळून ३८ ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**डेहराडून :** उत्तराखंडमधील अल्मोडा जिल्ह्यात एक वेदनादायक रस्ता अपघात समोर आला आहे. मार्चुलाजवळ बस खड्ड्यात पडली आहे. या अपघातात ३८ जणांचा मृत्यू झाला आहे, तर अनेक जण जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृतांचा आकडा वाढू शकतो. घटनास्थळी मदत आणि बचावकार्य सुरू आहे.

उत्तराखंडमधील अल्मोडा जिल्ह्यातील मार्चुला परिसरात सोमवारी प्रवाशांनी भरलेली बस नदीत पडली. बसमध्ये ५५ हून अधिक प्रवासी होते. अपघाताची माहिती मिळताच पोलिस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. एसएसपी अल्मोडा घटनास्थळी पोहोचले आहेत. बचावकार्यासाठी एसडीआरएफची टीमही दाखल झाली आहे. घटनास्थळी बचावकार्य सुरू आहे. या अपघातात ३८ जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे. बस नैनीदांडा येथील किनाथ येथून रामनगरकडे जात होती. बस मार्चुला येथे येताच सरद बंदजवळ नदीत पडली. बस नदीत पडल्याने एकच दंगा झाला. काही लोकांचा जागीच मृत्यू झाला, तर काही लोक बसमधून फेकून खाली पडले. जखमी लोकांनी इतरांना माहिती दिली.



डेहराडूनः अल्मोडा जिल्ह्यात बस दरीत कोसळली.

माहिती मिळताच पोलिस आणि प्रशासनाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि मदत आणि बचाव कार्य हाती घेतले. जखमींना रुग्णालयात नेण्याचे काम करण्यात आले. नदीत मृतदेहांचा ढीग पडला होता. आजूबाजूला भयावह दृश्य दिसत होते. बसमध्ये अडकलेल्या मृतदेहांना मोठ्या कष्टाने बाहेर काढण्यात आले. वापरकर्ते कंपनीची बस असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. बस ४२ आसनी होती; मात्र बसमध्ये ५५ हून अधिक प्रवासी प्रवास करत होते. मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी शोक व्यक्त केला. धामी यांनी रस्ता अपघाताबद्दल शोक व्यक्त केला आहे. पोस्ट करताना त्यांनी लिहिले, की अल्मोडा जिल्ह्यातील मर्चुला येथे झालेल्या दुर्दैवी बस अपघातात प्रवाशांच्या मृत्यूची अत्यंत दुःखद बातमी मिळाली

जिल्हा प्रशासनाला तातडीने मदत आणि बचाव कार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. घटनास्थळी स्थानिक प्रशासन आणि राज्य आपत्ती निवारण दलाच्या टीम जखमींना बाहेर काढण्यासाठी आणि त्यांना उपचारासाठी जवळच्या आरोग्य केंद्रात नेण्याचे काम त्वरीत करत आहेत. गरज भासल्यास गंभीर जखमी प्रवाशांना एअरलिफ्ट करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. धामी यांनी अल्मोडा येथील बस अपघाताबाबत आपत्ती व्यवस्थापन सचिव, आयुक्त कुमाऊं विभाग आणि डीएम अल्मोरा यांच्याशी फोनवर चर्चा केली, घटनेची माहिती घेतली आणि बचाव आणि मदत कार्य जलदपणे पार पाडण्याच्या सूचना दिल्या. बचाव कार्यावर लक्ष ठेवण्यासाठी डेहराडून यांनाही तेथे खास पाठवले जात आहे.

मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी चार लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी एक लाख रुपयांची मदत करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. या घटनेची दंडाधिकारी चौकशी करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी कुमाऊं विभागाच्या आयुक्तांना दिले.

### दंडाधिकारी चौकशीचे आदेश

● कुमाऊं विभागाच्या आयुक्तांना या घटनेची दंडाधिकारी चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सीएम धामी यांनी बचाव आणि मदत कार्य वेगाने करण्याच्या सूचना दिल्या. धामी यांनी अल्मोडा येथील बस अपघाताबाबत आपत्ती व्यवस्थापन सचिव, आयुक्त कुमाऊं विभाग आणि डीएम अल्मोरा यांच्याशी फोनवर चर्चा केली, घटनेची माहिती घेतली आणि बचाव आणि मदत कार्य जलदपणे पार पाडण्याच्या सूचना दिल्या.

## पैशावरून भाजप कार्यकर्त्याचा खून

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**लोणावळा :** मावळातील पवनानगर परिसरात भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्याच्या खून प्रकरणाचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले. भाजप पदाधिकाऱ्याचा हातउसने दिलेल्या पैशांच्या वादातून मित्राने साथीदारांच्या मदतीने दगडाने ठेचून खून केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी मित्रासह तिघांना अटक केली. नीलेश दत्तात्रय कडू (वय ३२, रा. सावंतवाडी, पवनानगर, ता. मावळ) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली.

# आदिवासी समान नागरी संहितेतून बाहेर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांची :** झारखंड विधानसभा निवडणुकीसंदर्भात भाजपने रविवारी आपले ठराव पत्र प्रसिद्ध केले. पक्षाचे दिग्गज नेते आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत जारी करण्यात आलेल्या जाहीरनाम्यात समान नागरी संहितेचाही उल्लेख आहे. सरकार स्थापन झाल्यास राज्यात समान नागरी कायदा लागू केला जाईल, असे आश्वासन पक्षाने दिले आहे; मात्र या समान नागरी कायद्यातून आदिवासींना बाहेर ठेवले जाईल, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.



झारखंडमध्ये भाजपच्या जाहीरनाम्यात यूसीसीचा मुद्दा आला तेव्हा केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी पुन्हा एकदा सांगितले, की पक्ष समान नागरी संहितेत आदिवासींचा समावेश करणार नाही. आदिवासी संस्कृती वेगळ्या ठेवल्या पाहिजेत, यावर भर देण्यासाठी भाजपने कौटुंबिक कायद्यांमध्ये समानतेची मागणी केली आहे. आजची मोठी बातमी समान नागरी कायद्याची मागणी भाजप सातत्याने करत आहे. जनसंघाच्या काळापासून पक्ष समान नागरी संहितेबद्दल बोलत आहे. भाजप धर्मनिरपेक्ष राज्यात मुस्लिम वैयक्तिक कायद्याच्या अस्तित्वावर सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे; परंतु गेल्या वर्षभरात आदिवासींवर त्याचा कोणताही परिणाम होणार नाही, असे आश्वासन दिले आहे. याचे कारण असे, की भाजपकडे अजूनही उच्चवर्णीय पक्ष म्हणून पाहिले जाते आणि गेल्या काही वर्षांत दलित आणि आदिवासीही त्यांच्या व्होट बँकेत मोठ्या प्रमाणावर सामील झाले आहेत; परंतु या व्होट बँका समान नागरी कायद्याच्या चर्चेने संतप्त झाल्या आणि विधानसभेत आल्या.

गेल्या वर्षी जुलैमध्ये, भाजपचे मंत्री एसपी बघेल म्हणाले होते, की सरकार आदिवासींच्या पारंपारिक पद्धतींमध्ये हस्तक्षेप करणार नाही, तसेच तुष्टीकरणाचे राजकारण कोणत्याही किंमतीत समान नागरी कायद्याची अंमलबजावणी थांबवणार नाही. राज्यघटनेच्या सहाव्या अनुसूचीनुसार, ज्यामध्ये आसाम, मेघालय, त्रिपुरा आणि मिझोराम या काही आदिवासी भागांना विशेष तरतुदी देण्यात आल्या आहेत.

### वादाची शक्यता

● उत्तराखंड समान नागरी कायद्याच्या मसुद्यातही आदिवासींना त्याच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले असून, एकसमानतेचा अर्थ आदिवासी प्रथांशी छेडछाड होत नाही, असे स्पष्ट केले आहे. भाजपचे मेघालय उपाध्यक्ष बर्नार्ड मारक यांनीही गेल्या वर्षी सांगितले होते, की राज्यातील अनुसूचित क्षेत्रे यूसीसीच्या कक्षेबाहेर राहतील. मुस्लिमांचाही या कायद्याला विरोध असताना त्यांना मात्र सक्तीने कायदा लागू आणि आदिवासींना सूट यामुळे नवा वाद होण्याची शक्यता आहे.

## Selected

### स्कॉर्पिओ पलटी होऊन आठ ठार

**बलरामपूर :** बलरामपूर जिल्ह्यातील राजपूर येथील लाडूवा गावाजवळ शनिवारी रात्री ८.३० वाजता भरधाव वेगाने जाणारी स्कॉर्पिओ पलटी होऊन पाण्याने भरलेल्या खड्ड्यात घुसली. या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला. अपघातात गंभीर जखमी झालेल्या चालकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. रात्री उशिरा आणखी एका तरुणाचा मृतदेह खड्ड्यातून बाहेर काढण्यात आला. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील चार जणांचा समावेश आहे. ज्या खड्ड्यात स्कॉर्पिओ घुसली होती, तो खड्डा झुडपांनी वेढला होता आणि सुमारे १० फूट पाण्याने भरला होता.

अपघातानंतर वाहनाचे सर्व गेट लॉक झाले होते, काचाही बंद होत्या. त्यामुळे कोणालाही बाहेर पडता आले नाही. फक्त ड्रायव्हरच्या गेटची काच उघडी होती. दिवाळी साजरी करून सर्वजण कुस्मीहून सूरजपूरला परतत होते. ८ मृतांपैकी ७ लारिमा येथील रहिवासी होते. रविवारी सकाळी राजपूर सामुदायिक आरोग्य केंद्रात सर्व मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात आले. सात मृतदेह घेऊन कुटुंबीय दुपारी लारिमा येथे पोहोचले.

### बॅनर लावताना चौघांचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

**हैदराबाद :** आंध्र प्रदेशातील तडीपररू येथे एका समाजसुधारकाच्या पुतळ्याभोवती फ्लेक्सी बॅनर बांधताना चार जणांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला. पूर्व गोदावरी जिल्ह्यातील तडीपारू गावात सोमवारी सकाळी ही घटना घडली. आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनी मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांची भरपाई जाहीर केली आहे. नायडू यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला. जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय उपचार मिळतील याची खात्री करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

### २७ लाखांचा गुटखा जप्त

**कोल्हापूर :** महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील कोथळी गावच्या चेक पोस्ट येथे रोजी मध्यरात्री कर्नाटकातून महाराष्ट्रात येत असलेल्या गुटख्याच्या वाहनावर मुरुम पोलिसांकडून मोठी कारवाई करुन तब्बल २७ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तीन नोव्हेंबर रोजी मध्यरात्री सव्वा बाराच्या सुमारास उपविभागीय पोलिस अधिकारी शेलार यांना गुप्त बातमीदाराने गुटखा भरून पिकअप वाहन येत असल्याची माहिती दिली. शेलार यांनी मुरूम पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर गव्हाणे यांना माहिती दिली. यावरून गव्हाणे यांनी आपल्या सहकारी कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन जात कोथळी गावच्या चेक पोस्ट येथे वाहन पकडण्याच्या हेतूने सापळा रचला.

## प्रा लक्ष्मण हाकेंची जरांगेवर बोचरी टीका

# "लढायला लागते वाघाचे काळीज"

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** निवडणुकीत एका जातीच्या बळावर जिंकणे शक्य नाही, असे सांगत मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभेच्या रिंगणातून माघार घेत असल्याची घोषणा केली. विधानसभा निवडणुकीत आता फक्त मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध करणारे उमेदवार पाडायचे, असे जरांगे यांनी सांगितले. जरांगे यांच्या या घोषणेनंतर ओबीसी आरक्षण आंदोलक प्रा. लक्ष्मण हाके यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली.



जरांगे निवडणुकीतून माघार घेण्याच्या निर्णयाला गनिमी कावा म्हणत आहेत; पण रणांगणात लढायला वाघाचे काळीज लागते. जरांगे १३० उमेदवारांना पाडायची भाषा करत होते, त्याचे काय झाले, असा सवाल प्रा. हाके यांनी उपस्थित केला. ते म्हणाले, की मी मी नेहमी सांगत आलो होतो, जरांगे निवडणूक लढणार नाहीत किंवा सामोरे जाणार नाहीत. ते बारामतीच्या संहितेनुसार, वागत आहेत. जत्रा भरवणे सोपे असते; पण लढणे अवघड असते. लोकसभा निवडणुकीत जरांगे पाटील यांनी बारामतीच्या सांगण्यावरुन प्रचार केला; मात्र आता ओबीसी समाज एकटवल्याने जरांगे यांनी रणांगणातून माघार घेतली आहे. ही माघार त्यांनी बारामतीकरांच्या सांगण्यावरुन घेतली आहे. रणांगणात लढायला वाघाचे काळीज लागते. गनिमी काव्याचा काळ गेला, असा टोला त्यांनी जरांगे यांना लगावला.

जरांगे पाटील हा दिवसाला भूमिका बदलणारा माणूस आहे. ते मुंबईच्या वेशीवरून माघारी परतले होते. त्यांचा राजकारण, निवडणूक याबद्दल अभ्यास नाही. ज्या मुख्यमंत्र्यांनी पाठींबा दिला आहे, ते आता काम करणार नाही. ज्यांनी जरांगे यांना पाठींबा दिला होता. त्यांचा कार्यक्रम आता ओबीसी करणार. त्यांना निवडणुकीत पाडणार, ज्यांनी पत्र दिले, त्यांना भेटले त्याचा कार्यक्रम करणार, असे प्रा. हाके यांनी म्हटले आहे.

## पहिल्याच अधिवेशनात हंगामा

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**श्रीनगर :** जम्मू-काश्मीर विधानसभेच्या पहिल्याच अधिवेशनात गोंधळ झाला. आमदार एकमेकांविरोधात घोषणा देत होते.

# शेअर बाजारात ब्लॅक मंडे; गुंतवणूकदारांचे नुकसान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विदेशी गुंतवणूकदारांच्या सततच्या विक्रीमुळे शेअर बाजारात सोमवारी पुन्हा मोठी घसरण झाली. व्यवहाराच्या पहिल्या दोन तासांत सेन्सेक्स १४०० अंकांनी घसरला. या काळात निफ्टी २३ हजार ९०० च्या खाली गेला. या काळात गुंतवणूकदारांना सुमारे ८ लाख कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले.

बीएसईवर सूचीबद्ध सर्व कंपन्यांचे मार्केट कॅप ८.४४ लाख कोटी रुपयांनी घसरून ४३९.६६ लाख कोटी रुपयांवर आले आहे. मुहूर्ताच्या व्यवहाराच्या दिवशी वाढ झाल्यानंतर, भारतीय बाजारात पुन्हा विक्रीचा दबाव आला आणि सोमवारी सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही प्रमुख निर्देशांकांमध्ये घसरण दिसून आली. सकाळी १०:१५ वाजता सेन्सेक्स १,०१४ अंकांनी किंवा १.२७ टक्के घसरून ७८,७१०.३६ वर आला. दुसरीकडे, निफ्टी ३०८ अंकांनी किंवा १.२७ टक्के घसरून २३ हजार ९९७ स्तरावर व्यवहार करताना दिसला. या काळात गुंतवणूकदारांना सुमारे ६.८ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आणि 'बीएसई'वर सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप ६.८ लाख कोटी रुपयांनी घसरून ४४१.३ लाख कोटी रुपयांवर आले. तत्पूर्वी, 'बीएसई' सेन्सेक्स निर्देशांक १० अंकांनी किंवा ०.०१ टक्क्यांनी घसरून ७९,७१३ वर उघडला, तर निफ्टी ५० निर्देशांक किंचित वाढून ११ अंकांनी किंवा ०.०५ टक्क्यांनी २४,३१५.७५ वर उघडला. सुरुवातीच्या व्यवहारात दोन्ही निर्देशांक आणखी घसरले.

# सरवणकरांच्या बंडाचा शिंदे गटाला फटका?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शिंदे गटाचे उमेदवार सदा सरवणकर यांना भेटीसाठी नकार दिल्याने राज ठाकरे 'आर या पार'च्या मूडमध्ये असल्याचा स्पष्ट संदेश शिवसैनिकांत गेला आहे. गेल्या काही दिवसांच्या वाक्युद्धानंतर माहीमचा लढा आता स्पष्ट झाला आहे. अमित ठाकरे यांच्यासाठी माघार न घेतल्याने सरवणकर व शिंदे सेनेविरोधात मनसैनिकांचा राग असणार आहे. हा राग फक्त माहीमच नाही, तर मुंबईतील शिंदे गटाविरोधात असलेल्या १२ मतदारसंघांमध्ये निघण्याची शक्यता आहे.

## पोलिसांची केवळ बघ्याची भूमिका

# कॅनडामध्ये हिंदूंवरील हल्ल्यात वाढ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**टोरंटो :** कॅनडातील मंदिर परिसरात हिंदूंवर झालेल्या हल्ल्याबाबत कॅनडाच्या पोलिसांवर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. 'सोशल मीडिया'वर कॅनडाच्या पोलिसांविरोधात लोकांचा रोष वाढत आहे. लोकांचे म्हणणे आहे, की खलिस्तानी लोकांसोबत पोलिस कॅनडातील हिंदूंचा नायनाट करण्यात व्यस्त आहेत. त्याच वेळी, आणखी एका 'सोशल मीडिया' वापरकर्त्याने लिहिले, की केवळ संरक्षणाची मागणी करणाऱ्या हिंदूंनाच ताब्यात घेणाऱ्या कॅनडाच्या पोलिसांची काय वृत्ती आहे? या घटनेचा कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांच्यासह अनेक नेत्यांनी तीव्र शब्दात निषेध केला आहे.

कॅनडातील भारतीय उच्चायुक्तांनीही याबाबत ट्रूडो सरकारवर प्रश्न उपस्थित केले आहेत. 'सोशल मीडिया' वापरकर्ता मिहिर झा यांनी पोस्ट केले, की खलिस्तानींनी कॅनेडियन पोलिस आणि सुरक्षा दलांमध्ये घुसखोरी केली आहे. अधिकारी खलिस्तानी दहशतवाद्यांमध्ये सामील झाले आणि हिंदूंवर हल्ले केले. अधिकारी खलिस्तानी दहशतवाद्यांमध्ये सामील होतात आणि हिंदूंवर हल्ले करतात; हा कॅनडातील हिंदूंवर सरकार प्रायोजित हल्ला आहे

आणखी एका 'सोशल मीडिया यूजर'ने लिहिले, की कॅनडाचे पोलिस त्याच हिंदूंना अटक करत आहेत, ज्यांनी त्यांना खलिस्तानीपासून संरक्षणासाठी बोलावले होते. कॅनेडियन पोलिस ज्या हिंदूंना खलिस्तानीपासून संरक्षणासाठी बोलावले त्यांना अटक करत आहे. कॅनडात राज्य यंत्रणेशी तडजोड केली जात नाही. प्रत्येक कॅनेडियनला त्याच्या विश्वासाचे पालन करण्याचा अधिकार आहे. पंतप्रधान ट्रूडो कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी सोमवारी ब्रॅम्प्टन येथील मंदिरात हिंदूंवर झालेल्या हल्ल्याचा निषेध केला. हा हल्ला खलिस्तानी समर्थकांनी केल्याचे सांगण्यात आले. ट्रूडो म्हणाले, की देशात हिंसाचार अस्वीकार्य आहे. रविवारी ब्रॅम्प्टनमधील हिंदू सभा मंदिरात खलिस्तानी समर्थकांकडून भाविकांवर हल्ला करण्यात आला,

Shri Vithal Institute of Progressive Education's
**Institute of Computer and Management Studies, Kasegaon, Pandharpur**
**(Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur)**
**NON-MINORITY**
UNAIDED
Applications are invited for the Post of PRINCIPAL from the Academic Year 2024-2025

| Sr. No. | Designation | Total Vacant Post |
| --- | --- | --- |
| 1) | Principal | 01 |

1) The above post is open to all; however candidates from any category can apply for the post.
2) Educational Qualification, Service Conditions & pay scale will be applicable as per existing rules prescribed by the UGC Notification dtd.18th July 2018, Govt. of Maharashtra solution No.Misc- 2018/C.R.56/18 UNI-1dts 8th March 2019 and University Circular No. PAHSUS/Estt/7pay/2019/2285/ dtd.25th March 2019.
3) Candidates should submit their Academic Research Score (Academic Performance Indicator) report with related documents. (Only for the post of Principal)
4) A relaxation of 5% shall be allowed at the Bachelors as well as at the Masters level for the candidates belonging to SC/ST/OBC (Non-creamy Layer)/Differently-abled for the purpose of eligibility and assessing good academic record for direct recruitment.
5) Reserved candidates, who are domiciled out of Maharashtra State, will be treated as Open category candidates.
6) Reserved candidates should also to send a copy of their application to the Deputy Registrar, Special Cell, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur.
7) Application received after the last date will not be considered. The College will not be responsible for postal delay, if any.
8) Reservation for women and disable persons will be as per the Govt. norms.
9) Reserved category candidates shall produce the Caste Validity Certificate as per the directives issued by the State Government vide Circular No. BCC-201/Pra. 1064/2011/16B dated 12-12-2011.
10) Reserved category candidates (except SC/ST) shall produce Non-Creamy Layer Certificate at the time of interview.
11) Applicants who are in service send their application through proper channel.
12) Applicants are required to account for breaks, if any, in their academic career.
13) Incomplete application will not be entertained.
14) TA, DA will not be paid for attending the interview.
15) Applications with full details should reach to the President, Shri Vithal Institute of Progressive Education, Kasegaon, Pandharpur within 30 days from date of publication of this advertisement. Incomplete application will not be entertained.
16) This is University approved Advertisement.

Place: Kasegaon
Date: 03/11/2024

**President**
Shri Vithal Institute of Progressive Education.

# विश्ववेध

## एआयच्या विश्वासार्हतेचा प्रश्न

एआयच्या विश्वासार्हतेचा प्रश्न एआय अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजेन्सच्या लार्ज लँग्वेज मॉडेल्समध्ये एलएलएम नवे तंत्रज्ञान असल्याने त्यात नवनव्या शक्यता निर्माण होत आहेत. याचवेळी त्यांच्या विश्वासार्हतेवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. अलीकडील संशोधनात असे आढळून आले आहे की, हे मॉडेल जितके सक्षम असतात, तितकेच ते चुकीची उत्तरे देखील देत असतात. असे मॉडेल्स युझर्सना आपण सर्वज्ञ आहोत, हे दर्शवण्याच्या प्रयत्नात त्यांचा मार्ग भरकटवण्यासाठी कारणीभूत ठरतात. स्पेनच्या व्हॅलेन्सियन रिसर्च इन्स्टिट्यूट फॉर एआयच्या एका अभ्यासातून हा दावा करण्यात आला आहे.



सदर संशोधनानुसार, ओपन एआच्या जीपीटी व मेटाच्या एललामा या मॉडेल्सनी काही अचूक उत्तरे जरूर दिली, पण याचबरोबर काही चुकीची उत्तरेही त्यांच्याकडून देण्यात आली. जसजसे प्रश्न जटिल होत गेले, तसतसे या मॉडेलकडून येणारे उत्तर त्यांची विश्वासार्हता कमी करणारे ठरत गेले, असे या अभ्यासात आढळून आले. तज्ज्ञांचा असा दावा आहे की, या मॉडेल्सवर विसंबून राहणे धोक्याचे ठरत चालले आहे. एरवी युझर्सचा अशा मॉडेल्सवर बराच विश्वास असतो, पण असा एकही प्रश्न असत नाही, ज्याचे उत्तर दिले जाणार नाही. या सर्व प्रक्रियेत प्रत्येक प्रश्नाला उत्तर देत असताना त्यांच्याकडे डेटा बराच असतो. पण, जितका प्रश्न कठीण, तितके त्याचे अचूक उत्तर मिळण्याची शक्यता अंधूक, असे समीकरण आता या आधुनिक मॉडेल्सबाबत दृढ होत चालले आहे असे या अभ्यासात पुढे नमूद आहे.

संशोधक जोस हर्नांडिझ ओरालो यांनी दिलेल्या माहितीनुसार, या अभ्यासात असेही आढळून आले आहे की, या मॉडेल्सचा फक्त आणि फक्त प्रत्येक प्रश्नाचे उत्तर द्यायचेच, यावर कटाक्ष असतो. आपण एखादा प्रश्न विचारल्यानंतर लगोलग अगदी दुसऱ्या सेकंदाला त्याचे उत्तर येते. याचाच अर्थ जो प्रश्न विचारला जाईल, त्याचा बहुतांशी डाटा त्यात फिड असतो. यापूर्वीचे मॉडेल एखाद्या प्रश्नाचे ठोस उत्तर माहीत नसल्यास त्यासाठी थोडाफार अवधी घेत असत, पण आता तसे होताना दिसून येत नाही.

आताचे नवे मॉडेल्स आपण सर्वज्ञ असल्याचे भासवतात आणि अशी प्रवृत्ती बुलशिटिंग असे म्हटले जाते. याचे मुख्य कारणच हे आहे की, या मॉडेल्सना केवळ प्रत्येक प्रश्नाचे उत्तर द्यायचे, यासाठीच प्रशिक्षित केले गेले असते आणि या पार्श्वभूमीवर त्यांचे उत्तर बरोबर असेलच, याची खातरजमा दिली जाऊ शकत नाही, असे सध्याचे चित्र आहे. भरलेल्या डेटामध्येच चुकीचा डेटा असेल तर त्याचे उत्तर चुकीचेच येणार, ही देखील यातील आणखी एक बाजू आहे.

## इथे इंटरनेट वापरणे गुन्हा!

आजच्या युगात इंटरनेट हा जणू आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. एक काळ असा होता, जेव्हा लोक टूजी इंटरनेट वापरून देखील खूश होते, पण आता फोरजी इंटरनेट स्पीड देखील लोकांना कमी पडू लागली आहे. कारण, आता रोजच्या जीवनातील सर्वच गोष्टी इंटरनेटशी संबंधित आहेत. मनोरंजक कामासाठी जसे व्हिडीओ, सिनेमे पाण्यासाठी देखील इंटरनेट महत्त्वाची भूमिका बजावतो, पण तरीही असे काही देश आहेत जिथे इंटरनेट वापराला बंदी आहे किंवा त्यावर कडक निर्बंध आहेत. आता हे देश कोणते असा प्रश्न साहजिकच निर्माण होईल. उत्तर कोरिया, तुर्कमेनिस्तान, क्यूबा यांचा यात प्रामुख्याने समावेश आहे.



**राजकीय स्थिरता :** अनेक देशांमध्ये सरकार इंटरनेटला एक धोका म्हणून पाहतात. इंटरनेटमुळे लोकं जागृत होतात आणि सरकार विरोधी भावना पसरू शकतात. धार्मिक कारणे : काही देशांमध्ये धार्मिक कारणांसाठी इंटरनेटवर बंदी असते. त्यांना वाटते की इंटरनेटवर अशी माहिती उपलब्ध आहे जी त्यांच्या धार्मिक विश्वासांच्या विरोधात आहे.

काही देशांमध्ये सरकारला वाटते की इंटरनेटमुळे समाजात अराजकता पसरू शकते. काही देशांमध्ये इंटरनेटवर बंदी आहे, कारण त्यांना वाटते की इंटरनेटचा वापर दहशतवादी कारवायांसाठी होऊ शकतो. उत्तर कोरिया हा सर्वात कडक इंटरनेट नियम असलेला देश आहे. येथे इंटरनेटचा वापर फक्त सरकारच्या अधिकाऱ्यांपर्यंत मर्यादित आहे. तुर्कमेनिस्तानमध्येही इंटरनेटवर बंदी आहे, फक्त काही विशिष्ट वेबसाइट्सलाच प्रवेश मिळतो.

क्यूबामध्ये इंटरनेटचा वापर खूप मर्यादित आहे आणि त्यासाठी विशेष परवाना आवश्यक आहे. इंटरनेटवर बंदी असल्यामुळे लोकांना बाह्य जगातील घडामोडींबद्दल माहिती मिळणे कठीण होते. इंटरनेट शिकण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. इंटरनेटवर बंदी असल्यामुळे शिक्षणावर परिणाम होतो. इंटरनेटचा वापर व्यापार आणि उद्योगांसाठी खूप महत्त्वाचा आहे. इंटरनेटवर बंदी असल्यामुळे देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम होतो, अशी पार्श्वभूमी यामागे आहे.

## चीनी लोकांच्या आवडत्या इंडियन डिश

चीन आणि भारत दोन्ही देशांची संस्कृती वेगवेगळी. या दोन्ही देशांच्या खाद्यपदार्थांमध्येही बराच फरक आहे. तरी दोन्ही देश आवडीने एकमेकांच्या पदार्थ खातात. तसे पाहिले तर चायनीज म्हणताच अनेकांच्या तोंडाला पाणी सुटले असेल. अनेक लोक आवडीने चायनीज फूड खातात. कुणाला चायनीज राइस, चायनीज नूडल्स, चायनीज सूप असे एक ना दोन किती तरी पदार्थ आहेत.



जसे भारतात चायनीज मिळते, तसे चीनमध्ये भारतीय पदार्थ मिळतात. जसे भारतात चायनीज फूड आवडीने खातात तसे चीनमधील लोकांनाही भारतीय पदार्थ आवडतात. चिनी लोक भारतीय खाद्यपदार्थांची खूप कौतुक करतात. त्यांना मसालेदार आणि चविष्ट खायला आवडते. चीनमध्ये भारतीय पदार्थांची प्रसिद्धी वाढत आहे. बीजिंग, शांघाय, शेंझेनसारख्या बड्या शहरात भारतीय रेस्टॉरंट्सची संख्या वाढली आहे. भारतातील समुद्री झिंगा मासा आणि इतर सी-फूड चिनींना खूप आवडते. चीनमध्ये हे आवडीने खाल्ले जाते. सध्या भारतातील अमृतसर कुल्चा चीनमध्ये लोकप्रिय आहे. भारतीय मिठाईसुद्धा चिनी लोकांना खूप आवडते. गुलाबजामुन, जिलेबी, रसगुल्ला या मिठायांचा यात समावेश आहे.

## आधार राखीव स्कायसूटचा

भारतातील काही निवडक ठिकाणी स्काय डायव्हिंगचा आनंद घेता येतो. स्कायडायव्हिंगमध्ये, हेलिकॉप्टरमधून किंवा डोंगरावरून उंचावरून उडी घेतली जाते, त्यावेळी पॅराशूट उघडते. त्यानंतर सेफ लँडिंगची प्रक्रिया सुरू होते. साधारणपणे, डायव्हर्स स्कायडायव्हिंगमध्ये ४००० मीटर उंचीवरून म्हणजे १२५० फूट उडी मारतात. अशावेळी पॅराशूट योग्य वेळी उघडले नाही तर स्कायडायव्हिंग करणे कठीण होऊ शकते. अनेकदा हा प्रश्न अनेकांच्या मनात येतो की स्कायडायव्हिंग करताना पॅराशूट उघडले नाही तर डायव्हरचा जीव कसा वाचणार, हे महत्त्वाचे ठरते.



स्काय डायव्हिंगमध्ये, जेव्हा डायव्हर उंचावरून उडी मारतो. त्यामुळे बहुतांश स्कायडायव्हर्ससाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पॅराशूट, पण कधी कधी स्कायडायव्हरचे पॅराशूट उघडत नाही. त्यामुळे अशा स्थितीत स्कायडायव्हरकडे एक राखीव पॅराशूट असते. राखीव पॅराशूट डायव्हरद्वारे स्वतः उघडले जाऊ शकते. जेव्हा मुख्य पॅराशूट उघडत नाही तेव्हा हे राखीव पॅराशूट अधिक विश्वासार्ह होण्यासाठी डिझाइन केलेले आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत हे पॅराशूट उघडता येते. त्यामुळे डायव्हरच्या जीवाला धोका नाही.

नवीन स्कायडायव्हर्स जेव्हा डायव्हिंग करायला जातात, तेव्हा त्यांना प्रशिक्षण दिले जाते. शिवाय, अनेकदा लोकांसोबत एक प्रशिक्षक देखील असतो, जो त्यांच्याबरोबर कोण उडी मारतो. त्यामुळे अशा परिस्थितीत प्रशिक्षक आपत्कालीन परिस्थिती हाताळू शकतो. तो योग्य वेळी पॅराशूट उघडू शकता.

## पाण्यात वाढणारे फळ!



**आपण कधी विचार केला आहे का की, असे कोणते फळ असेल जे पाण्यात वाढते आणि झाडावर नाही? हे ऐकून नक्कीच आश्चर्य वाटेल! पण असे एक फळ खरेच अस्तित्वात आहे. या वनस्पतीची पाने पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगतात, तर त्याची मुळे पाण्याखाली जमिनीत रुजलेली असतात. त्याचे वनस्पतीशास्त्रीय नाव आहे ट्रापा नटान्स, ज्याला आपण शिंगाडा म्हणतो. या इंग्रजीत वॉटर चेस्टनट म्हणतात. शिंगाडा हे एक अनोखे फळ आहे, जे तलावांमध्ये किंवा शांत पाण्याच्या प्रवाहांमध्ये वाढतं.**

**शिंगाड्याचं फळ एका विशिष्ट आकाराचे असते, जे बैलाच्या शिंगासारखं दिसतं. म्हणूनच त्याला शिंगाडा म्हणतात. या फळाचा बाहेरचा भाग काळा आणि कठीण असतो, तर आतील गर पांढरा आणि स्वादिष्ट असतो. भारतात शिंगाडा एक लोकप्रिय फळ आहे. उपवासादरम्यान याचा विशेष वापर केला जातो. याच्यापासून पीठ बनवले जाते, ज्याचा वापर विविध पदार्थ बनवण्यासाठी होतो. शिवाय, हे फळ पौष्टिक देखील आहे. त्यात प्रथिने, कार्बोहायड्रेट्स आणि खनिजे मुबलक प्रमाणात असतात. विचार करण्यासारखे हे आहे की, निसर्गाने कशी अद्भुत रचना केली आहे! आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या फळाची चव इतर फळांइतकीच गोड आणि पौष्टिक आहे.**

## युक्ती...२८ कोटी जिंकण्यासाठी!

लॉटरी हा नशिबाचा खेळ असतो. एखाद्याला लागली तर त्याचे आयुष्यच बदलून जाते; अन्यथा अनेकांचे पैसे वाया जाऊ शकतात. चीनमध्येही एका व्यक्तीला लॉटरी लागल्यामुळे त्याचे पूर्ण आयुष्य बदलून गेले आहे. याचे कारण असे की, त्याला एक-दोन नाही तर चक्क २८ कोटी रुपयांची लॉटरी लागली आहे. तो अनेक वर्षांपासून लॉटरीचे तिकीट खरेदी करत होता, मात्र नशिबाची साथ त्याला मिळत नव्हती. यावेळी मात्र त्याने एक शक्कल लढवली व त्याला पहिले बक्षीस मिळाले. आता तो कोट्यधीश बनला आहे आणि सोशल मीडियावर आता त्याने नेमकी कोणती शक्कल लढवली, याची चर्चा सुरु झाली आहे.

चीनमधील एका व्यक्तीला एका युक्तीमुळे २४ मिलियन युआनची (अंदाजे २८ कोटी रुपये) लॉटरी लागली आहे. डबल कलर बॉल नावाच्या संस्थेने १० सप्टेंबरला विजेत्यांच्या नावांची घोषणा केली, तेव्हा त्याच्या कुटुंबीयांच्या आनंदाला पारावार उरला नाही. मध्य चीनमधील हेफेई प्रांतात राहणाऱ्या या चिनी व्यक्तीला पहिल्या क्रमांकाचे बक्षीस जाहीर झाले. यामुळे त्याची परिस्थिती पालटली. बक्षीस जाहीर झाल्यानंतर तो म्हणाला, 'गेल्या १० वर्षांहून अधिक काळ मी लॉटरीची तिकिटे घेत होतो, पण त्यासाठी कधीही २० युआनपेक्षा (अडीचशे रुपये) जास्त खर्च केला नाही. तिकिटे घेत असलो तरी कधी जॅकपॉट लागेल, अशी अपेक्षा केली नव्हती. खरेदी करण्याबरोबरच दानही केले पाहिजे असे मला वाटते. जिंकणे म्हणजे केवळ एक बोनस आहे.'



त्या चिनी व्यक्तीने सांगितले की, पहिल्यांदा लॉटरी खेळायला सुरुवात केली, तेव्हा आवडीचे क्रमांक घेत होतो. मग एकदा एका लॉटरी विजेत्याची गोष्ट वाचली. त्याने त्याच्या कुटुंबीयांच्या जन्मतारखांचा वापर करून तिकीट खरेदी केले होतं. तीच युक्ती त्यानेही वापरली व ११९ रुपयांचे तिकीट खरेदी केले. ते तिकीट त्याच्यासाठी नशीब बदलणारे ठरले. या युक्तीचा वापर तो २०१७ सालापासून करत होता, असे विजेत्या चिनी व्यक्तीने सांगितले. अखेर त्याची युक्ती कामी आली व त्याला आता २४ मिलियन युआन इतकी बक्षिसाची रक्कम मिळाली. त्याच्या म्हणण्यानुसार, त्याने त्यापैकी ११ लाख रुपये दानही केले आहेत. लॉटरीचा खेळ म्हणजे संयमाची परीक्षा असते, पण बक्षीस मिळालं तर नशीब बदलून जाते; मात्र लॉटरी घेत असताना जॅकपॉटची अपेक्षा ठेवण्याऐवजी आपण समाजाप्रती काही बांधिलकी ठेवतो, याची जाणीव असावी, असे तो याबद्दल बोलताना म्हणतो.


## पुन्हा धोका वटवाघळांचा

वटवाघळं म्हणजे वेगवेगळ्या विषाणूंची जिवंत थैलीच असतात, असे म्हटले जाते व ते खरेही आहे. गेल्या काही वर्षांत कोरोनाने अवघ्या जगभरात धुमाकूळ घातल्याचं पाहायला मिळालं. 'सार्स-कोव्ह-२' हा 'कोव्हिड-१९' ला जबाबदार कोरोना विषाणूही वटवाघळामधूनच आला असे म्हणणारे अनेक लोक आहेत. कोरोनाची दहशत कमी होत असतानाच आता आणखी एक नवी समस्या दार ठोठावत आहे. वटवाघळांमुळे आता एक नवा विषाणु आफ्रिकेत फैलावलेला आढळला असून त्याचे नाव 'मारबर्ग' असे आहे.



डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, ९० टक्के रुग्णांसाठी तो घातक आहे. जगात आतापर्यंत ८ रुग्णांचा यामुळे मृत्यू झाला आहे.

या विषाणूमुळे रुग्णांना ताप, तोंडाची चव कमी होणे, तीव्र डोकेदुखी, अंगदुखी अशा समस्यांचा सामना करावा लागतो. तसेच जुलाब, पोटात मुरड येणे, उलट्या आणि पोटदुखी यांसारखी लक्षणेही दिसतात. सध्या मारबर्ग विषाणू रवांडा, पूर्व आफ्रिकेत पसरला आहे. येथील परिस्थिती पाहून जागतिक आरोग्य संघटनेने आफ्रिकन देशांमध्ये त्याच्या धोक्याबाबत अलर्ट जारी केला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने मास्क घालण्याचा आणि सामाजिक अंतर राखण्याचा सल्ला दिला आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, रवांडामध्ये आतापर्यंत २६ प्रकरणांची पुष्टी झाली आहे. संघटनेच्या अहवालानुसार, हा संसर्ग रवांडाच्या ३० जिल्ह्यांमध्ये पसरला आहे. २६ पैकी २० रुग्णांची प्रकृती चिंताजनक आहे. सध्या रवांडामधील रुग्णांना आयसोलेशनमध्ये ठेवण्यात आले आहे. याशिवाय संक्रमित लोकांच्या संपर्कात आलेल्या सुमारे १६० लोकांवर नजर ठेवण्यात येत आहे.



## एलियन्सचा पुरावा सापडला?



एलियनबाबत प्रत्येकालाच कुतूहल असते आणि बहुधा ते कायम राहणार. एलियन असतात आणि ते पृथ्वीवरील माणसांच्या संपर्कात असतात असे दावे केले जातात. अनेकदा ते विवादास्पद ठरतात पण तरी असे दावे सुरूच राहतात. सायमन हॉलंड नामक नासा फिल्म निर्मात्याने असाच एक दावा केला आहे. पृथ्वीवरील दुर्बिणींच्या मदतीने बुद्धिमान एलियनच्या अस्तित्वाचे अवशेष सापडल्याचा दावा हॉलंड यांनी केला आहे. सायमन हॉलंड हे बीबीसी आणि नासा यांनी आर्थिक सहकार्य केलेल्या प्रोजेक्टस्चा भाग म्हणून डॉक्युमेंट्रीज करतात. पृथ्वीवरील दुर्बिणींच्या मदतीने पृथ्वीबाहेर बुद्धिमान एलियनचे अस्तित्व सापडल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्या अस्तित्वाचे पुरावे एक महिन्याहून कमी काळात प्रसिद्ध केले जातील, असेही त्यांनी म्हटले आहे.

या शोधाबद्दल सांगताना हॉलंड म्हणाले, 'ऑक्सफर्डच्या सहकार्यातून सुरू असलेल्या एका कार्यक्रमाचा भाग म्हणून अलौकिक संकेतांचा शोध घेतला जात आहे. आपल्या आकाशगंगेतील मानवेतर बुद्धिमत्ता ओळखण्याची त्याची क्षमता आहे. हा संकेत म्हणजे रेडिओ तरंगांचा पाच तासांहून जास्त काळ चाललेला स्फोट होता. पृथ्वीपासून सुमारे ४.२ प्रकाशवर्षे दूर असलेल्या प्रॉक्सिमा सेंटॉरीच्या आसपास त्याची निर्मिती झाली असावी, असा अंदाज असल्याचे हॉलंड यांनी स्पष्ट केले. या संकेतांचे विश्लेषण करत असल्याचे ऑक्सफर्डकडून सांगण्यात आले आहे; मात्र त्याच्या संभाव्य स्रोताबाबत माहिती देण्यात आलेली नाही. 'डेलीमेल डॉट कॉम'शी बोलताना हॉलंड म्हणाले, ऑक्सफर्ड याबाबत अधिक संशोधन करत असल्यामुळे अधिक माहिती प्रकाशित करण्यास विलंब होत आहे. २९ एप्रिल २०१९ ला हा सिग्नल पहिल्यांदा नोंदवण्यात आला. तेव्हापासून तो नेहमीच चर्चेता विषय ठरला आहे. रेडिओ सिग्नल सध्या कमी प्रमाणात असल्याचं हॉलंड सांगतात.

ऑक्सफर्डच्या 'ब्रेक थ्रू लिसन' या ना नफा योजनेचा हवाला देऊन हॉलंड म्हणाले, सिग्नल अत्यंत हलक्या स्वरुपाचा आहे आणि त्याचा अभ्यास करताना अनेक तांत्रिक समस्या येत आहेत; मात्र हा सिग्नल एखाद्या एलियन प्रजातीकडून येत आहे, हे निश्चित आहे. हॉलंड पुढे म्हणाले, आम्हाला आपल्या आकाशगंगेत ऑक्टोबर २०२१ मध्ये एक मानवेतर बुद्धिमत्ता आढळली आहे. लोकांना अद्याप याबाबत माहिती नाही. या बुद्धिमत्तेकडून येणारा सिग्नल हा प्रॉक्सिमा सेंटॉरीच्या वरच्या भागातून येत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. यापूर्वी असे सिग्नल फॉल्स पॉझिटिव्ह असल्याचे स्पष्ट झाले; मात्र आता तसे नाही असे हॉलंड म्हणतात. हा सिग्नल हा ब्रह्मांडातील ध्वनीचा प्रतीध्वनी नाही तर एक संकीर्ण इलेक्ट्रोमॅग्नेटिक स्पेक्ट्रम होता, असा दावाही ते करतात. गुरुवारी त्यांनी सिग्नलचा स्रोत हा एकच बिंदू असल्याचा पुनरुच्चार केला. मानवेतर तांत्रिक हस्ताक्षर पुरावा सापडल्याचेही त्यांनी यावेळी म्हटले.



"घरच्या मैदानावर ३-० ने हार, हा पराभव पचवणे कठीण आहे आणि भारताला आत्मपरीक्षणाची गरज आहे. यात तयारीचा अभाव होता, शॉट्ची निवड खराब होती, की सामन्याचा सराव कमी पडला ?' 'शुभमन गिलने पहिल्या डावात चांगली कामगिरी केली आणि ऋषभ पंतने दोन्ही डावात उल्लेखनीय खेळ केला.
— सचिन तेंडुलकर

'हे पाहा, सराव सामना खेळण्याऐवजी आम्ही सामन्याप्रमाणेच सरावाची योजना आखली आहे. त्या सराव सामन्याबद्दल सांगायचं झालं, तर आम्ही भारतीय संघातील १९ खेळाडूंना घेऊन जाणार आहोत आणि हा सराव सामना फक्त तीन दिवसांचा होणार होता.
— रोहित शर्मा



## १२ वर्षाखालील मुलांची आंतरक्लब क्रिकेट स्पर्धा !

# एसएआरके, लिजंड्स संघ विजयी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एसए-आरके ॲकॅडमी तर्फे आयोजित 'एसए-आरके अजिंक्यपद करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट (२५ षटके) स्पर्धेत एसएआरके क्रिकेट ॲकॅडमी आणि लिजंड्स क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून दिवाळी साजरी केली.






मांजरी येथील पीजी क्रिकेट मैदान आणि हांडेवाडी येथील एसए-आरके ॲकॅडमी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अभय परब याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर एसएआरके क्रिकेट ॲकॅडमीने लिजंड्स क्रिकेट ॲकॅडमीचा ३२ धावांनी पराभव केला. एसएआरके क्रिकेट ॲकॅडमीकडून माही सूंकाळे ५० धावांची खेळी केली. गोलंदाजीमध्ये एसएआरके संघाच्या अभय परब याने १५ धावांमध्ये निम्मा संघ बाद केला. दुसऱ्या सामन्यामध्ये माही सूंकाळेने हिने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे एसएआरके क्रिकेट ॲकॅडमीने विराग क्रिकेट ॲकॅडमीचा ९ गडी राखून सहज पराभव केला.

आर्यन मिश्रा याने केलेल्या नाबाद ८९ धावांच्या जोरावर लिजंड्स क्रिकेट ॲकॅडमीने विराग क्रिकेट ॲकॅडमीचा ५९ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना लिजंड्स क्रिकेट ॲकॅडमीने १३७ धावांचे लक्ष्य उभे केले. यामध्ये आर्यन मिश्रा याने नाबाद ८९ धावांची खेळी केली. या आव्हानाला उत्तर देताना विराग क्रिकेट ॲकॅडमीचा डाव ७८ धावांवर गडगडला.

# नमिश हूड, आर्यन किर्तने यांचा अंतिम फेरीत प्रवेश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** नवसह्याद्री क्रीडा संकूल यांच्या तर्फे व शेपिंग चॅम्पियन्स फाउंडेशन पुणे यांच्या सहकार्याने आयोजित व एआयटीए, एमएसएलटीए, पीएमडीटीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एमएसएलटीए - नवसह्याद्री क्रीडा संकूल अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज (१४ वर्षाखालील) टेनिस स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये मुलांच्या गटात महाराष्ट्राच्या नमिश हूड, आर्यन किर्तने यांनी मानांकित खेळाडूंना पराभवाचा धक्का देत अंतिम फेरीत प्रवेश केला.

नवसह्याद्री क्रीडा संकूल टेनिस कोर्ट येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत एकेरीत उपांत्य फेरीत मुलांच्या गटात क्वालिफायर पुण्याच्या नमिश हूडने आपला शहर सहकारी सहाव्या मानांकित स्मित उंद्रेचा ६-३, ६-३ असा पराभव करून आपली अनपेक्षित निकालाची मालिका कायम राखली. पुण्याच्या बिगर मानांकित आर्यन किर्तनेने अव्वल मानांकित प्रज्ञेश शेळकेचा टायब्रेकमध्ये ७-५, ७-६(१) असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.

मुलींच्या गटात अव्वल मानांकित राजस्थानच्या आराध्या मीनाने पाचव्या मानांकित महाराष्ट्राच्या सृष्टी सूर्यवंशीचा ६-४, ६-३ असा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

दुसऱ्या मानांकित पुण्याच्या श्रावी देवरेने चौथ्या मानांकित प्रार्थना खेडकरचा ६-१, ५-७, ६-१ असा तीन सेटमध्ये संघर्षपूर्ण पराभव करून अंतिम फेरी गाठली.

दुहेरीत उपांत्यपूर्व फेरीत मुलांच्या गटात महाराष्ट्राच्या अव्वल मानांकित तनिश पाटील व स्मित ऊंद्रे यांनी महाराष्ट्राच्या वेदांत जोशी व तामिळनाडूच्या तेजस होल्ला यांचा ६-२, ७-५ असा तर, दुसऱ्या मानांकित वीर चतुर व सर्वज्ञ सरोदे यांनी हृषव रावळ व रौनक सेठी यांचा ६-४, ७-६(४) असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

# केपी क्रिकेट अकादमी, बार्शी तालुका क्रिकेट संघाचे विजय





**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत केपी क्रिकेट अकादमी, बार्शी तालुका क्रिकेट अकादमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली. धायरी येथील स्टार स्पोर्टस मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत मल्हार धुमाळ(२-० व नाबाद ३२धावा) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर केपी क्रिकेट अकादमी संघाने स्टार स्पोर्टस क्रिकेट अकादमी संघाचा ९ गडी राखून पराभव केला. दुसऱ्या सामन्यात प्रथमेश डोईफोडे(नाबाद ५६ धावा) याने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर बार्शी तालुका क्रिकेट अकादमी संघाने एचके बाऊन्स क्रिकेट अकादमी संघाचा पराभव करून पहिला विजय मिळवला.

# गौतम गंभीरचे 'पंख' बीसीसीआय छाटणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय संघाला घरच्या मैदानावर न्यूझीलंडकडून लाजीरवाणा पराभव पत्करावा लागला. तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत 'शूभ्र धुलाई' होण्याही ही भारताची पहिलीच वेळ ठरली. विराट कोहली, रोहित शर्मा यांच्या कामगिरीवर चर्चा सुरूच आहे, परंतु मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर हाही आता रडारवर आला आहे.



इंडिया विरुद्ध न्यूझिलंड मालिकेत झालेल्या मानहानिकारक पराभवानंतर बीसीसीआय सक्रिय झाली आहे आणि आता खेळाडूंसह प्रशिक्षकाच्या कामगिरीचा अहवाल मागवला गेला आहे. त्यामुळे कदाचित गौतम गंभीरसोबतच करारही मोडला जाण्याची शक्यता आहे.

राहुल द्रविडचा मुख्य प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ संपल्यानंतर गौतमची निवड करण्यासाठी बीसीसीआय ने रेड कार्पेट अंथरला. त्याला सपोर्ट स्टाफमध्ये केकेआर ची टीम घुसवायची होती, तेही म्हणणे ऐकले गेले. पण, निकाल शून्य लागला. श्रीलंकेत २७ वर्षानंतर भारतीय संघाने वन डे मालिका गमावली.

# रिझवानची पाकिस्तानच्या कर्णधारपदी निवड

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाविरूद्ध पाकिस्तान वन-डे मालिकेला उद्यापासून सुरूवात होणार आहे. तीन सामन्यांची ही मालिकाअसून पहिला सामना ऑस्ट्रेलियातील मेलबर्न क्रिकेट मैदानावर खेळण्यात येणार आहे. या मालिकेसाठी दोन्ही संघाची घोषणा झाली व पाकिस्तानच्या कर्णधारपदाची जबाबदारी यष्टिरक्षक-फलंदाज रिझवानवर सोपवण्यात आली आहे.

# पाकिस्तान पण भारताला हरवेल! : वसिम अक्रम

**नवी दिल्ली :** भारताचा न्यूझीलंडकडून घरच्या मैदानावर ०-३ असा धक्कादायक मालिका पराभवानंतर पाकिस्तानचा माजी कर्णधार वसीम अक्रम याचा आत्मविश्वास वाढला आहे. रोहित शर्मा अँड टीमचा खेळ पाहून त्याला असे वाटू लागले आहे की, पाकिस्तानचा संघही टीम इंडियाला कसोटीत हरवू शकतो. इंग्लंडचा माजी फलंदाज मायकेल वॉन आणि पाकिस्तानचा महान खेळाडू वसीम अक्रम यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील कसोटी मालिकेच्या संभाव्य निकालावर नव्या वादाला तोंड फोडले आहे. मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर ऑस्ट्रेलिया विरुद्ध पाकिस्तान वन डे सामन्यात हे दोघं समलोचन करत आहेत. तेव्हा वॉनने सुचवले की भारत-पाकिस्तान यांचा कसोटीतील फॉर्म पाहता या दोघांमध्ये मनोरंजक स्पर्धा होऊ शकते. "मला भारत आणि पाकिस्तान यांच्यातील कसोटी मालिका बघायची आहे," असे वॉनने म्हटले. अक्रमनेही या मागणीला सहमती दर्शवली,"हा सामना खूप मोठा असेल आणि हे या खेळासाठी व क्रिकेट वेड्या राष्ट्रांसाठी चांगले असेल," असे अक्रम म्हणाला. घरच्या मैदानावर फिरकीविरुद्ध भारतीय फलंदाजांच्या अलीकडच्या संघर्षाचा संदर्भ देत वॉन म्हणाला की, "पाकिस्तान आता भारताला फिरकीपटूंच्या जोरावर हरवू शकतो."



# आराध्या, अंश, प्रज्ञेश, शिवराज यांची आगेकूच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ईएमएमटीसी तर्फे आयोजित व एटीएफ, एआयटीए व एमएसएलटीए यांच्या मान्यतेखाली ईएमएमटीसी - एमएसएलटीए एआयटीए १४ वर्षाखालील क्ले कोर्ट राष्ट्रीय टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत पहिल्या फेरीत महाराष्ट्राच्या आराध्या म्हसदे, अंश रमाणी, प्रज्ञेश शेळके, शिवराज जाधव यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.

ईएमएमटीसी टेनिस कॉम्प्लेक्स छत्रपती संभाजी नगर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉच्या पहिल्या फेरीत महाराष्ट्राच्या अव्वल मानांकित आराध्या म्हसदे याने दिल्लीच्या यश शर्माचा ६-२, ६-१ असा तर, महाराष्ट्राच्या अंश रमाणीने कर्नाटकच्या संजय कुमारचा ६-४, ६-३ असा पराभव केला. महाराष्ट्राच्या स्मित उंद्रेने हरियाणाच्या हर्ष मारवाहचे आव्हान ६-१, ६-० असे मोडीत काढले.

चुरशीच्या लढतीत तिसऱ्या मानांकित राजस्थानच्या विवान मिर्धाने तेलंगणच्या निकुंज खुराणाचा ३-६,७-५, ६-४ असा तीन सेटमध्ये संघर्षपूर्ण पराभव केला. महाराष्ट्राच्या शिवराज जाधवने आपला राज्य सहकारी नमिश हुडचा ६-१, ६-४ असा तर, अकराव्या मानांकित प्रद्न्येश शेळकेने राम मगदूमचा ६-३, ६-१ असा पराभव करून दुसरी फेरी गाठली.

स्पर्धेचे उदघाटन छत्रपती संभाजीनगर महापालिका आयुक्त जी. श्रीकांत सज्जन(आयएएस ), एन्ड्युरन्स ग्रुपचे उपमहाव्यवस्थापक कॅप्टन कवी कंबन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्र प्रमुख आशुतोष मिश्रा, सुपरवायझर सर्वानन पॉलराज, मुख्य प्रशिक्षक प्रवीण प्रसाद, एन्ड्युरन्सचे अभिनव मिश्रा व प्रविण गायसमुद्रे आणि एन्ड्युरन्स सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

# ऑस्ट्रेलियाने पहिल्या वनडेत पाकिस्तानला हरविले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहिल्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा २ गडी राखून पराभव केला आहे. मेलबर्न येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात पाकिस्तान संघ प्रथम खेळताना २०३ धावांवरच मर्यादित राहिला, प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने ९९ चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. पाकिस्तान संघात परतलेल्या शाहीन आफ्रिदीने २ महत्त्वाच्या विकेट घेतल्या, मात्र संघाला विजयापर्यंत नेऊ शकला नाही. या सामन्यात बाबर आझमही चर्चेचा केंद्रबिंदू ठरला, त्याने अवघ्या ३७ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाने यासह तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो योग्य ठरला. ऑस्ट्रेलियाच्या घातक गोलंदाजीमुळे पाकिस्तानने ७० धावांपर्यंत ४ विकेट गमावल्या होत्या आणि दरम्यान बाबर आझम ३७ धावांवर अ‍ॅडम झम्पाच्या गोलंदाजीवर क्लीन बोल्ड झाला. नवा कर्णधार मोहम्मद रिझवानने ४४ धावा केल्या. शाहीन आफ्रिदीने २४ धावांची तर नसीम शाहने ४० धावांची खेळी खेळून प्रभावित केले. ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्कने सर्वाधिक विकेट घेतल्या, ज्याने ३ फलंदाजांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे

### जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४०४/२०२४ | ३५८९

**अर्जदार**
मानस क्रेस्ट रो हाऊस सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ता : सेक्टर नं.१३, प्लॉट नं. ११९, चिखली प्राधिकरण, ता. हवेली, पुणे - ४११ ०१९ तर्फे अध्यक्ष : श्री. अजितकुमार टी नायर, सचिव : श्री. प्रशांत हणमंत घाडगे

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
१.मे. मानस लिला डेव्हलपर्स नोंदणीकृत भागीदारी संस्था तर्फे भागीदार
श्री. मनिष प्रकाश जैन
ऑफिस पत्ता : संगिता अपार्टमेंट, विवेक नगर, आकुर्डी, पुणे - ४११ ०३५.
जागा मालक / जाब देणार नं २
२. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण निगडी, पुणे-४४ तर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी
भाडेपट्टा धारक/ जाब देणार नं. ३
३. श्री. बाजीराव गंगाराम नेवाळे, ४. श्री. लिलाबाई बाजीराव नेवाळे, ५. श्री. रामा बाजीराव नेवाळे, ६. श्री. दामु सखाराम नेवाळे, ७. सौ. कांताबाई दामु नेवाळे, ८. श्री. किशोर दामु नेवाळे, ९. .भारती बाळासाहेब सावंत, १०. श्री. नारायण तुकाराम नेवाळे, ११. श्री. हनुमंत तुकाराम नेवाळे १२. श्री. गोरखनाथ तुकाराम नेवाळे, १३. श्रीमती भागुबाई तुकाराम नेवाळे
अ.क्र.२ ते १३ रा.चिखली प्राधिकरण, ता. हवेली, पुणे - ४११०१९.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये मानस क्रेस्ट रो हाऊस सहकारी गृहरचना संस्था मर्या. पत्ता : सेक्टर नं.१३, प्लॉट नं. ११९, चिखली प्राधिकरण, ता. हवेली, पुणे - ४११ ०१९ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४०४/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १७/१०/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. आदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते १२ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते १२ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक १२/११/२०२४ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते १२ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे दिनांक : ३०/११/२०२४

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे

### जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४०३/२०२४/३५९२

**अर्जदार**
श्रीनिवास पार्क सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ता : स. नं.४७/३ अ, सीटीएस नं. ३२६/१६, घोरपडी गाव, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ००१ तर्फे अध्यक्ष : श्री. गजाल्ला चिन्ना वेंकटा सुब्बा रेड्डी, सचिव : श्री. राजशेखर चावकुला

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
में सिद्धीविनायक तेजस असोसिएटस
ऑफिस पत्ता : ४४८, मंगलवार पेठ जि. पुणे - ४११ ०११
तर्फे भागीदार
अ. श्री. अखिल विजय अग्रवाल
पत्ता : ऑफिस नं.२०१, सिद्धीविनायक केशर, बिल्डींग ४३१ अ, सोमवार पेठ, पुणे - ४११ ०११
ब. श्री. रमेश दत्तात्रय आढाव
पत्ता : ऑफिस नं. ए/ए दुसरा मजला, नॉर्थ कोर्ट बिल्डींग, लेन नं.१२, जॉगर्स पार्क समोर, कल्याणी नगर, पुणे - ४११००६
२. सौ. मोहिनी माणिकलाल मंत्री, ३. श्री. राजेश माणिकलाल मंत्री अनु क. २ व ३ रा. १८९, घोरपडी गाव, पुणे ११ ४.सौ. किरण घनश्याम झंवर, रा. सितालक्ष्मी बिल्डींग, कचेरी गल्ली, शहापुर, बेळगाव - ५९०००३
५. सौ. करुणा योगेश बियाणी, रा. एफ- २७, सिटाडेल, घोरपडी, पुणे- ४११ ०११
६. सौ. कविता गिरीष चांडक, रा. राहुल बंगला भवानी पेठ, सोलापूर ४१३००२.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये श्रीनिवास पार्क सहकारी गृहरचना संस्था मर्या. पत्ता : स. नं.४७/३ अ, सीटीएस नं. ३२६/१६, घोरपडी गाव, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ००१ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४०३/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १७/१०/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ब, २ ते ६ गैरहजर. गैरअर्जदार/ जमिन मालक क्र. १ब, २ ते ६ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक १२/११/२०२४ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ब, २ ते ६ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे दिनांक : ३०/१०/२०२४

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे

### जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ३८९/२०२४/३५८७

**अर्जदार**
दि ऑनेक्स सी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्वे नं. 186, वाकड, ता. हवेली, जि. पुणे - 411057
तर्फे, अध्यक्षः कु. पल्लवी जयप्रकाश शहारे, सचिव : श्री. अनुराग अशोक मायी

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
1. मे. वास्तुकल्प प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स तर्फे भागीदार
श्री. हनुमंत शंकर भिलारे, श्री. नितीन उर्फ दत्तात्रय चिंधु कलाटे
रा. सर्वे नं.186, नवीन दत्त नगर, ओमेगा सिटी जवळ, वाकड, पुणे – 411057
2. श्री. शंकर नारायण भिलारे (मयत) तर्फे वारस
अ. पार्वती शंकर भिलारे, ब. सौ. जयश्री संजय कोतवाल
क. श्री. संतोष शंकर भिलारे, ड. श्री. हनुमंत शंकर भिलारे सर्व रा. थेरगाव, ता. मुळशी, जि. पुणे- 411033
इतर सहकरी संस्था
3. दि ऑनेक्स ए व बी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्वे नं. 186, वाकड, ता. हवेली, जि. पुणे - 411057.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये दि ऑनेक्स सी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या. पत्ताः सर्वे नं. 186, वाकड, ता. हवेली, जि. पुणे- 411057 या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ३८९/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १०/१०/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की. सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०६/११/२०२४ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे दिनांक : ३०/११/२०२४

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे

### जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ३१७/२०२४

**अर्जदार**
ब्ल्यू डाईस डी-१ बिल्डींग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
पत्ताः गट नं. १५९३, १५९६ पार्ट, १५९७/१, १५९७/२, १६००, १६०१, १६०२, चिखली, ता. हवेली, जि. पुणे ४११ ०६२ तर्फे, अध्यक्ष, श्री. रविंद्र राजाराम मोरे, सचिव, श्री. संदीप श्रीपती खरात

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
१. मे. डी. के. असोसिएटस
ऑफिस पत्ता : ११, लक्ष्मीतारा मार्केट, थेरगाव, डांगे चौक, पुणे ४११ ०३३ तर्फे
प्रोप्रायटर, श्री. धनराज केसरीमल सोनिगरा रा. २०९, मेन बाजार, देहुरोड, पुणे ४१२१०१
२. श्वेताली केसरीमल सोनिगरा, रा. गट नं. १५९३, १५९६, चिखली, ता. हवेली, जि. पुणे ४११ ०६२
३. श्री. रमेश केसरीमल सोनिगरा, रा. गट नं. १६००, १६०१, १६०२, चिखली, ता. हवेली, जि. पुणे
४. ब्ल्यू डाईस सी-१ बिल्डींग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
५. ब्ल्यू डाईस सी-२ बिल्डींग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित ६. ब्ल्यू डाईस डी - २ बिल्डींग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित ७. ब्ल्यू डाईस डी-३ बिल्डींग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः गट नं. १५९६ पार्ट, १५९७/१ व १५९७/२, चिखली, ता. हवेली, जि. पुणे ४११ ०६२

१. महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये आणि लागू असलेल्या नियमान्व्ये अर्जदाराने प्रवर्तकांच्या / प्रतिपक्षाच्या विरुध्द वरील अर्ज दाखल केला आहे.

२. प्रवर्तक / वादी यांना त्यांच्या बचावासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकिलामार्फत अथवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीमार्फत सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ येथे दिनांक ०७/११/२०२४ रोजी दु. ३.०० वा. लेखी उत्तर दाखल करण्यासाठी बोलावण्यात येत आहे आणि दाखल केलेले उत्तर कोणतेही असल्यास सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांचे कार्यालयामध्ये दि. ०७/११/२०२४ रोजी दु. ३.०० वा. या वेळेत उत्तर प्राप्त करुन घ्यावे असा सल्ला देण्यात येत आहे.

३.प्राप्त झालेले / न झालेले लेखी उत्तर विचारात घेऊन वरील प्रकरणातील अंतिम सुनावणी, तोंडी युक्तीवाद सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ५ येथे दिनांक ०७/११/२०२४ रोजी दु. ३.०० वा. निश्चित करण्यात येत आहे.

४. आपण व्यक्तीशः किंवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधी मार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास किंवा दिनांकांना उपस्थित राहिला नाही तर प्रकरणाचा गुणवत्तेवर निर्णय देण्यात येईल.

सदरची नोटीस आज दिनांक ३०/११/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे

### जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४०१/२०२४/३५९१

**अर्जदार**
सुमेरू गार्डन सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ता : सर्व्हे नं. ५५/३/१ब, उदय बाग, घोरपडी, ता. पुणे शहर, जि. पुणे- ४११ ००१. तर्फे : अध्यक्ष : श्री. प्रविण सुरेश कामथे, खजिनदार : श्री. बापूराव रामहारी सावंत

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
1.मे.सुमेरू कन्स्ट्रक्शन प्रा.लि, कंपनी कायदया अंतर्गत नोंदणीकृत, तर्फे संचालक, अ. श्री. सुरेंद्र आर. सानस ब. श्री. महेंद्र जी तुरखीया क. श्री. मन्सुर टी. पुनावाला
ड. उज्वला आर. सानस
ऑफिस पत्ता- ४०७/५, गीता भवन, नाना पेठ, ता. हवेली जि. पुणे - ४११ ००२. २. ए. श्री. बबन काशिनाथ कवडे बी. अरुणा बबन कवडे
सी. श्री. हेमराज बबन कवडे, डी. श्री. महेश बबन कवडे, ई. नागेश बबन कवडे एफ. रेखा बाळकृष्ण यांदवे, जी. जयश्री महेंद्र मुरकुटे
जाब देणार नं. २ ए ते जी रा. सर्व्हे नं. ५५/३/१ब, उदय बाग, घोरपडी, ता. पुणे शहर, जि. पुणे - ४११००१.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये सुमेरू गार्डन सहकारी गृहरचना संस्था मर्या. पत्ता : सर्व्हे नं. ५५/३/१ब, उदय बाग, घोरपडी, ता. पुणे शहर, जि. पुणे- ४११००१ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४०१/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १७/१०/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक १२/११/२०२४ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे दिनांक : ३०/१०/२०२४

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे

### जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ३७४ /२०२४१३५८४

**अर्जदार**
साई लॉरेल पार्क फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स.नं. ४७(पैकी), प्लॉट नं. बी, पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे - ४११ ०६१.
तर्फे, अध्यक्ष : श्री. विनायक भास्करराव राऊत, सचिव : श्री. दर्शन अरुण म्हात्रे, खजिनदारः श्री. ऋषभकुमार एस. सिंह

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
विकसक / जाब देणार नं. १
१. मे. जगताप पाटील प्रमोटर्स अँड बिल्डर्स, नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफिस पत्ता- स.नं.७९/१, चंद्ररंग पार्क, सुदर्शन नगर, पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे- ४११०२७.
तर्फ भागीदार, ए. श्री. विजय पांडूरंग जगताप, बी. श्रीमती. शोभा रामदास जगताप,
सी. श्री. राजेंद्र आप्पासाहेब जगताप, डी. श्री. चिराग जयजिंग जगताप, ई. सौ. रेश्मा सुनिल कवडे,
एफ. श्री. आदित्य लक्ष्मण जगताप, ए ते एफ सर्व रा. पत्ता- पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०२१.
२. पांडुरंग खंडूजी जगताप (मयत) चंद्रभागा पांडुरंग जगताप (मयत)
मयत तर्फे वारस, ए. श्री. विजय पांडुरंग जगताप, बी. जनाबाई साहेबराव उंद्रे, सी. सविता बाबासाहेब साखरे डी. अलका दत्तात्रय झेंडे, ई. श्री. शंकर पांडुरंग जगताप, एफ. सौ. वासंती विजय रेणुसे
लक्ष्मण पांडुरंग जगताप (मयत) मयत तर्फे वारस
जी. श्रीमती. अश्विनी लक्ष्मण जगताप, एच. ऐश्वर्या विराज रेणुसे, आय. आदित्य लक्ष्मण जगताप
कै. भिकाबाई अप्पासाहेब जगताप (मयत) मयत तर्फे वारस
कै. जयसिंग अप्पासाहेब जगताप (मयत) मयत तर्फे वारस
जे. श्रीमती. संजना जयसिंग जगताप, के. ज्योती उर्फ मनिषा गणेश गायकवाड,
एल. शितल नितीन इंगवले, एम. रेश्मा सुनिल कवडे, एन. रूपाली प्रसाद देवकर, ओ. किरण मोहन काळभोर,
पी. काजल गणेश कुऱ्हाडे, क्यु. चिराग जयसिंग जगताप,
कै. रामदास आप्पासाहेब जगताप (मयत) तर्फे वारस
आर. श्रीमती. शोभा रामदास जगताप, एस. राजेंद्र अप्पासाहेब जगताप,
जाब देणार ए ते एस सर्व रा. पत्ता- पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे- ४११०२१
(जाब देणार नं. २ तर्फे कु. मु. म्हणुन जाब देणार नं. १ )
इतर संस्था / जाब देणार नं. ३
३. साई लॉरेल पार्क बिल्डींग अ सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ताः स. नं. ४७(पैकी), प्लॉट नं. बी, पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०६१.


उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये साई लॉरेल पार्क फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्या. पत्ता : स.नं. ४७ (पैकी), प्लॉट नं. बी, पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०६१ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ३७४ / २०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ११/१०/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृद्धी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ३ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०७/११/२०२४ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे दिनांक : ३०/११/२०२४

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

# काटे की टक्कर





## पुणे शहर विधानसभा मतदारसंघातील प्रमुख लढती

**कसबा**
- हेमंत रासने **(महायुती)**
- रवींद्र धंगेकर **(महाविकास)**
- कमल व्यवहारे **(अपक्ष)**

**खडकवासला**
- भीमराव तापकीर **(महायुती)**
- सचिन दोडके**(महाविकास आघाडी)**
- मयुरेश वांजळे **(मनसे)**

**पर्वती**
- अश्विनी नितीन कदम **(महाविकास आघाडी)**
- माधुरी मिसाळ **(महायुती)**
- सुरेखा गायकवाड **(वंचित)**
- रवींद्र क्षीरसारगर **(रिपब्लिकन पार्टी)**
- आबा बागुल**(अपक्ष)**
- सचिन तावरे **(अपक्ष)**
- अश्विनी अनिल कदम **(अपक्ष)**
- अश्विनी नितीन कदम **(अपक्ष)**

**हडपसर**
- चेतन तुपे **(महायुती)**
- साईनाथ बाबर (मनसे)
- प्रशांत जगताप (महाविकास आघाडी)

**शिवाजीनगर**
- सिद्धार्थ शिरोळे (महायुती)
- दत्ता बहिरट (महाविकास आघाडी)
- मनीषा आनंद (अपक्ष)

**पुणे कॅन्टोन्मेंट**
- सुनील कांबळे **(महायुती)**
- रमेश बागवे **(महाविकास आघाडी)**
- निलेश अल्हाट **(वंचित)**
- यशवंत नडगम **(महाराष्ट्र स्वराज्य)**
- लता गुरु **(अपक्ष)**

**कोथरुड**
- चंद्रकात पाटील **(महायुती)**
- किशोर शिंदे **(मनसे)**
- चंद्रकांत मोकाट **(महाविकास आघाडी)**

**वडगाव शेरी-**
- हुलगेश मर्याप्पा चलवादी **(बसपा)**
- बापूसाहेब तुकाराम पठारे **(मविआ)**
- सुनील विजय टिंगरे **(महायुती)**
- चंद्रकांत परमेश्वर सावंत
- विनोद कुमार ओझा **(हिंदू समाज पार्टी)**
- विवेक कृष्णा लोंढे **(वंचित)**
- शेषनारायण भानुदास खेडकर
- सचिन दुर्वा कदम
- सतीश इंद्रजीत पांडे
- संजय लक्ष्मण पडवळ
- अनिल विठ्ठल धुमाळ
- अभिमन्यू शिवाजी गवळी
- बापू बबन पठारे (अपक्ष)
- मधुकर मारुती गायकवाड
- राजेश मुकेश इंद्रेकर
- शशिकांत धोंडीबा राऊत

## १७८ जणांची माघार; ३०३ उमेदवार रिंगणात

**पुणे, जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघात अर्ज माघारीच्या अंतिम दिवशी १७८ जणांनी माघार घेतली असुन, ३०३ उमेदवार रिंगणात उरले आहेत. सात मतदारसंघात दोन इएमव्हीची मतपत्रिका असेल.** गेल्या आठवड्यात उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर अर्जांची छाननी झाली. यामध्ये ४८२ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत सोमवार दुपारी तीनपर्यंत होती. या दिवशी १७८ जणांनी अर्ज मागे घेतले असुन, ३०४ उमेदवार रिंगणात आहेत. सर्वांत जास्त उमेदवार इंदापुर ( २४ ) आणि बारामती ( २३ ) या दोन विधानसभा मतदारसंघात आहेत. त्याखालोखाल चिंचवड मतदारसंघात २१ उमेदवार रिंगणात आहे. या तीनसह पुरंदर, वडगांव शेरी, हडपसर , पुणे कॅन्टोन्मेट या ठिकाणी आता दोन इव्हीएमची एक मतपत्रिका असेल. एका ईव्हीएम मध्ये पंधरा उमेदवारांची नावांचा समावेश करता येतो. तसेच एक वरील पैकी कोणी नाही (नोटा ) हे मत नोंदविता येते. यामुळे वरील सात मतदारसंघात दोन ईव्हीएमची मतपत्रिका असेल. सर्वांत कमी उमेदवार भोर आणि मावळ या दोन मतदारसंघात असुन, या ठिकाणी प्रत्येकी सहा उमेदवार रिंगणात आहेत. wअर्ज माघारीच्या दिवशी सर्वांत जास्त अर्ज पिंपरी या मतदारसंघातून मागे घेण्यात आले. त्याखालोखाल शिरुर ( १४), हडपसर मधुन १२ उमेदवारांनी अर्ज मागे घेतला. सर्वांत कमी पर्वती विधानसभा मतदारसंघातून पाच उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. पुणे जिल्ह्यातील जुन्नर ( ११), आंबेगाव (११), खेड ( १३), शिरुर ( ११), दौंड (१४), इंदापुर (२४), बारामती (२३), पुरंदर (१६), भोर (६), मावळ (६), चिंचवड (२१), पिंपरी ( १५), भोसरी (११), वडगांव शेरी(१६), शिवाजीनगर ( १३), कोथरुड (१२), खडकवासला (१४), पर्वती (१५), हडपसर (१९), पुणे कॅन्टोन्मेट (२०) तर कसबा पेठ मतदारसंघातून १२ उमेदवार रिंगणात आहेत.

मातंग समाजाचे राज्याचे नेते,
भाजपा प्रवक्ते (महाराष्ट्र राज्य)

आमदार मा.श्री.
अमितजी गोरखे साहेब
यांना वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा





5 नोव्हेंबर



शुभेच्छुक
युवक नेते
श्री. कृष्णा वाघमारे,
पंढरपूर

# मागासांच्या प्रगतीसाठीचा आश्वासक युवा चेहरा!

**समाजाच्या संख्याबळावर राजकीय** सामाजिक मांडवली करत स्वतःची आर्थिक सत्तासने निर्माण करणारे नेते अनेक झाले परंतु मातंग समाजासारख्या मागास समाजातून येत स्वसामर्थ्यावर आर्थिक संपन्न झाल्यानंतर समाजातील कार्यकर्त्यांसाठी न्यायिक वर्गीकरणाच्या लढ्यासह लोकशाहीरांचा पुतळा रशियामध्ये उभा करण्यासाठी धडपडणारा , समाजाच्या तरुणांनी श्रीमंत व्हावं यासाठी काम करणारा, एक आश्वासक युवा चेहरा आमदार अमित गोरखे यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर नव्याने उजळत आहे. खरंतर लोकशाहीर अण्णाभाऊंनी संघर्षाचे पहिले शस्त्र हे लेखणीला बनवले . या समाजाला पुन्हा त्याच वाटेवर घेऊन जाणारा हा चेहरा राज्यातील मागास चळवळीला एक वेगळा सकारात्मक आयाम देऊ शकतो. आज वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला संक्षिप्त आढावा !



▶ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत आ. अमित गोरखे




अमित गोरखे



आमदार अमित गोरखे यांनी शपथविधीपूर्वी पंढरपुरात येऊन श्री विठ्ठलाचे दर्शन घेतले त्यावेळी त्यांच्या समवेत कृष्णा वाघमारे

राष्ट्राच्या राजकारणात हिंदू - मुस्लिम हा जसा वाद सर्वच पक्षांकडून पोसला जातो तसा महाराष्ट्राच्या समाजकारणात या वादाला मराठा - ब्राह्मण किंवा मराठा - ओबीसी अशाही संघर्षाची एक सूप्त किनार आहे . यामध्ये मराठा - दलित या संघर्षाचाही एक अंतर प्रवाह आहे. परंतु सर्व समाज घटकांमध्ये आरक्षणाला समान न्याय मिळतो तो मागासवर्गीय समाजात मिळत नाही अनुसूचित जाती जमातीमध्ये सर्वच घटकांना समान आरक्षण मिळावे हा एक मोठा संघर्ष गेल्या काही वर्षांपासून पुढे आला आहे.

दलित समाजात उपवर्गीकरणाच्या मुद्द्याने देखील सामाजिक आणि राजकीय संघर्ष धगधगत आहे. या सगळ्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवरती सर्व समाजाला सक्षम नेतृत्व मिळाले , परंतु मागास आणि त्यातल्या त्यात चर्मकार किंवा मातंग समाजाला अलीकडच्या काळात फार प्रगतशील नेतृत्व मिळाले नाही.

नवनिर्वाचित विधानपरिषद सदस्य आणि मातंग समाजाचे युवा नेते असलेले अमित गोरखे यांच्या माध्यमातून ह्या संपूर्ण संघर्षाला आणि चळवळीला एक नवा चेहरा लाभत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून संघीय राजकारणात रमलेले अमित गोरखे हे तसे हिंदुत्ववादी भाजपाच्या जवळचे मानले जाणारे नेतृत्व आहे. भाजपाने लक्ष्मण हाके , गोपीचंद पडळकर, मध्यंतरीच्या काळात उत्तमराव जानकर , लक्ष्मणराव ढोबळे असे काही ' समाजाचे ठेकेदार' म्हणून काही नेत्यांना ताकद दिली . परंतु त्यांचा कल केवळ आरक्षणाच्या नावाने आरडाओरडा, हमरी - तुमरी , झुंडशाही , दबाव तंत्र किंवा मग्रुरी अशांकडे होता आणि आहे . अमित गोरखे हे अशा कुठल्याच पठडीत बसत नाहीत. एक शांत, संयमीत आणि बुद्धिवादी मांडणी करणारा एक युवक तरुण त्या दृष्टिकोनातून त्यांची प्रतिमा घडत गेली. सर्वसाधारणपणे अशा समाजातील नेते हे राजकीय मांडवली वरतीच घडले ,हा इतिहास आहे . परंतु गोरखे यांनी शिक्षण , उद्योग , शिक्षण संस्थांच्या माध्यमातून रोजगार अशा पाऊलवाटेने स्वतःची आर्थिक सक्षमता करून घेतली. त्यामुळे कुठल्या मांडवलीवर , सुपारीवर , समाजाच्या ठेकेदारीवर राजकारण करण्याची त्यांना कधी जरुरी पडली नाही. त्यामुळे आपल्या जीवावर राजकारण करण्यासाठी - पैसे कमवण्यासाठी हे नेतृत्व घडत नाही याची जाणीव या समाजातील सामान्य समाज घटकाला झाली. अमित गोरखे यांच्याकडून जे घडेल ते स्वतः करिता नाही तर समाजाच्या हितासाठीच असेल हा विश्वास वृद्धिंगत होत गेला आणि म्हणून या युवा आश्वासक नेत्याला सर्वसामान्य गरीब पिचलेल्या मातंग समाजाच्या अंतिम घटकाचा , तळागाळातील कार्यकर्त्यांचा पाठिंबा भेटत गेला.

वर उद्धृत केले त्याप्रमाणे प्रत्येक समाजामध्ये संघर्षाचा एक अंतर प्रवाह वाहत आहे , त्याच पद्धतीने दलित समाजात देखील सर्वच दलित घटकांना समान आरक्षणाच्या लाभाकरिता एक संघर्ष गेल्या अनेक वर्षांपासून उभा राहत आहे . या सर्व समान घटकाच्या लाभाकरिता आरक्षणाचे वर्गीकरण करावे हा भाजपाचा फार पूर्वीपासूनचा अजेंडा आहे. म्हणूनच अ ब क ड प्रमाणे आरक्षणाचे वर्गीकरण व्हावे आणि अनुसूचित जातीच्या सर्वच घटकांना समान न्याय मिळावा हा संघर्ष अमित गोरखे यांनी पुढे नेला. अनुसूचित जातीचा वर्ग वाटा हा १३% चा आहे या १३ टक्क्यात आरक्षणाचे अ ब क ड असे उपवर्गीकरण करण्याचा विषय हा मोठ्या प्रमाणात मार्गे लागण्याची आता अशा निर्माण झाली आहे.

२०११ च्या जनगणने प्रमाणे अनुसूचित जातीच्या लोकसंख्येत मातंग समाजाचा वाटा हा १९ % आहे आणि या संपूर्ण समाजाला पहिल्यांदाच इतक्या व्यापक स्तरावरती एक आश्वासक आणि बुद्धीवादी नेतृत्व मिळाले आहे. अमित गोरखे यांनी बार्टीच्या धरती वरती आरटी च्या स्थापना प्रक्रियेला बळ देऊन या समाजाच्या विकासाकरिता एक आश्वासक पाऊल उचलले आहे . वर्षानुवर्षे या समाजाच्या नेतृत्वांना जे जमले नाही ते गोरखे यांच्या माध्यमातून घडत असताना पहिल्यांदाच दिसत आहे.

अमित गोरखे यांना देवेंद्र फडणवीस यांनी आमदारकी दिली . शिवाय या निवडणुकीत देखील दोन मातंग उमेदवारांना सत्तेचे पायदान उपलब्ध करून दिले त्यामुळे हा पक्ष आपल्या समाजाला जवळ करतो आहे हा एक संदेश या निमित्ताने गेला.

अमित गोरखे यांच्या माध्यमातून एक उच्च विद्या विभूषित , खऱ्या अर्थाने संघर्षातून पुढे आलेल्या आणि स्वतःच्या सामर्थ्यावर उद्योग - व्यवसाय करत रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देणाऱ्या अशा एका आदर्श युवा व्यक्तिमत्त्वाला आपण प्रमोट करत आहोत हा चाणाक्षपणा भाजपाने केला. कुठल्याही समाजाला आपल्या नेतृत्वा प्रति प्रचंड अस्मिता असते. अण्णाभाऊ साठे हे या समाजाचे दैवत आहे. अशा अण्णाभाऊंचा पुतळा रशियामध्ये उभा करण्यात आमदार अमित गोरखे यांनी पुढाकार घेतला . या समाजाच्या आर्थिक उत्थानाकरिता झटणारा एकमेव युवा नेता म्हणून सध्या ते पुढे येत आहेत. प्रत्येक कार्यकर्त्याबद्दल मायक्रो प्लॅनिंग करून त्याने आर्थिक सक्षम कसे व्हावे हा त्यांचा ध्यास असतो. केवळ माझ्या पाठीमागे गर्दी करत झुंडशाहीची शक्ती वाढवू या.... विचारापेक्षा या समाजाला श्रीमंत करण्याकडे त्यांचा कल आहे. हा विचार कधीच या समाजातील कुठल्याही नेत्याने केला नाही तब्बल चाळीस हजार किलोमीटरचा प्रवास करून राज्यातील कानाकोपऱ्यामध्ये अमित गोरखे हे समाज बांधवांना भेटत होते . त्यांच्याशी चर्चा करत होते आणि त्यांचे प्रश्न समजून घेऊन सत्ताधाऱ्यांशी संवाद साधत होते. म्हणून त्यांच्या शपथविधी वेळी राज्यभरातून अशा फाटक्या - तुटक्या, मळक्या कपड्यातील गोरगरीब कार्यकर्त्यांची गर्दी विधानसभेच्या दारामध्ये दिसून आली. आपला नेता सत्तेस्थानी बसतोय हे हजारो गोरगरिबांच्या आशादायी नजरेतून बघितले आणि त्या नजरांची कृतकृत्य निरांजने गोरखे यांना ओवाळत होते. पुण्यामध्ये ते नोव्हेल इन्स्टिट्यूट नावाची शिक्षण संस्था चालवतात. त्या शिक्षण संस्थाचाही वटवृक्ष करण्याकडे त्यांचा कल आहे. मूल्याधिष्ठित तांत्रिक शिक्षणासह उद्याचा समाज घडविण्याकडे या शिक्षण संस्थांचा कल आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून मागास समाजाच्या प्रगतीसाठी लढणारा एक आश्वासक युवा चेहरा या निमित्ताने महाराष्ट्राला गवसला आहे . भारतीय जनता पक्षासारख्या पक्षाच्या विचारधारेतून त्यांचे नेतृत्व पुढे येत आहे . मातंग समाजाची आर्थिक प्रगती व्हावी , सामाजिक आणि राजकीय प्रतिष्ठा त्यांना प्राप्त व्हावी आणि अमित गोरखे यांना या कार्यासाठी अनेकांचे आशीर्वाद मिळावेत , त्यांना बळ मिळावे हीच सदिच्छा !

**— अनिरुद्ध बडवे**